रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २५२
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ३१ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## नक्षलवाद शेवटच्या घटका मोजतोय -केंद्रीय गृहमंत्री शाह



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे छत्तीसगडच्या बस्तर भागातील नक्षलवाद आता जवळजवळ संपला आहे. तो अखेरच्या श्वासावर आहे. आता जो कोणी हातात शस्त्र घेईल, त्याला जाब विचारला जाईल. अशा प्रकारची वर्तणूक कदापि खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दांमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी (दि. ३०) लोकसभेत नक्षलवादावरील चर्चेदरम्यान सरकारची भूमिका स्पष्ट केली. सरकार नक्षलवादाच्या मुद्द्यांबाबत संवेदनशील आहे; ते लोकांच्या सर्व तक्रारी ऐकून घेण्यास तत्पर असून त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही शाह यांनी सांगितले. काँग्रेसच्या कार्यकाळात नक्षलग्रस्त भागातील आदिवासींना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात आणि त्या भागाचा विकास करण्यात पक्ष अपयशी ठरला, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

अंतरंग
मुलींवर अत्याचार करणाऱ्याला नेपाळ सीमेवर अटक/२
सीकेटी कॉलेजमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा/६
कुस्ती स्पर्धेत अमेघा घरतची 'रूपेरी' कामगिरी/८

# उलवे येथे सुसज्ज मच्छी मार्केट उभारणार

## ■ मंत्री नितेश राणे यांची घोषणा; सी-फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील मत्स्य व्यवसायामध्ये मोठी क्षमता असून त्यासाठी बजेट वाढवून विकासाला गती देत आहोत. १ मेपासून राज्यभर फिश पाव स्टॉल संकल्पना सुरू करून युवक व महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मत्स्यव्यवसायमंत्री म्हणून कोणालाही रिकाम्या हाताने परत पाठवणार नाही. उलवे येथे आधुनिक व सुसज्ज मच्छी मार्केट उभारण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त गव्हाण येथे आयोजित उलवे नोड सी-फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन रविवारी मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी हे सातत्याने मच्छीमारांचे प्रश्न विधीमंडळात मांडत असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या आगरी-कोळी महोत्सवाच्या निमित्ताने मच्छीमार समाजाच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. सिडकोमुळे स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची टीका करत आमच्या जमिनी अत्यल्प दरात घेऊन आता प्रचंड दराने देण्याची पद्धत अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी जागा मिळण्यात होत असलेल्या विलंबाबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

आमदार महेश बालदी यांनी कोळी समाजाच्या विकासासाठी ठोस पावले उचलण्याची गरज अधोरेखित करत गव्हाण, न्हावा, गणेशपुरी, कोंबडभुजे या भागांमध्ये नवीन जेटी उभारण्याची मागणी केली. करंजा बंदरामुळे मच्छीमारांना मोठा दिलासा मिळाल्याचे सांगत भविष्यात आशियातील सर्वात मोठे बंदर येथे उभारले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार महेश बालदी पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष एक कुटुंब म्हणून काम करत असून लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जे.एम. म्हात्रे यांची जोडी शेकापला शून्यावर आणू शकते. त्यासाठी कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करावे.

सी-फूड फेस्टिव्हलच्या उद्घाटन समारंभाला रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, योगिता लहाने, वर्षा केवाळे, भाऊशेठ पाटील यांच्यासह आजी-माजी सरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वागत

**पनवेल : राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदी उपस्थित होते.**



# सिडको हद्दीतील बंगलो, रो-हाऊस प्लॉटवरील बहुनिवासी इमारती होणार नियमित!

**पनवेल, नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको हद्दीत बंगलो व रो-हाऊस प्लॉटवर उभारलेल्या बहुनिवासी इमारतींच्या नियमितीकरणाचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. परवानग्या रद्द होणे, हस्तांतरण प्रक्रियेतील अडथळे तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासात निर्माण झालेल्या अडचणींमुळे नागरिक त्रस्त होते. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको प्रशासन व शासनस्तरावर पाठपुरावा करून हा महत्त्वपूर्ण प्रश्न प्राधान्याने मांडला होता. याबाबत सिडको संचालक मंडळाने धोरणात्मक निर्णय घेतला असून यामुळे नवी मुंबईतील शेकडो गृहनिर्माण सोसायट्यांमधील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सिडकोने सुरुवातीला बंगलो व रो-हाऊस उभारणीसाठी प्लॉटची विक्री केली होती. त्यानंतर काही ठिकाणी बदलत्या गरजांचा विचार करून बहुनिवासी इमारती उभारण्यास परवानगी देण्यात आली, मात्र नगरविकास विभागाने सिडकोचा हा निर्णय रद्द करून अशा परवानग्यांवर स्थगिती आणली. परवानगी रद्द झाल्यामुळे आणि त्यातच अनेक इमारती मोडकळीस आल्याने व हस्तांतरण प्रक्रियादेखील ठप्प झाल्याने हजारो रहिवाशांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता आणि नवी मुंबईतील शेकडो सोसायट्यांमधील हजारो कुटुंबांवर त्याचा परिणाम झाला होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत प्रभावित रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती.



**आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश**

**हा निर्णय केवळ तांत्रिक नसून हजारो कुटुंबांच्या हक्कांशी संबंधित आहे. नियमितीकरणामुळे नागरिकांना त्यांच्या मालमत्तेवरील पूर्ण अधिकार मिळतील तसेच पुनर्विकास व आर्थिक व्यवहारांतील अडथळे दूर होतील. नवी मुंबईतील अशा सर्व प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळवून देण्यासाठी मी पुढेही प्रयत्नशील राहणार आहे.**
**-आमदार प्रशांत ठाकूर**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको प्रशासन व शासनस्तरावर पाठपुरावा केला. या अनुषंगाने १२ मार्च रोजी झालेल्या सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये वास्तवदर्शी परिस्थितीचा विचार करून अखेर धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. यामुळे अडकलेल्या प्रकरणांचा मार्ग मोकळा होणार असून संबंधित हजारो रहिवाशांना दिलासा मोठा मिळाला आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत या विषयानुषंगे झालेल्या सविस्तर चर्चेनुसार ज्या प्रकरणांमध्ये प्लॉटधारकांनी नियोजन प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेऊन बहुनिवासी इमारती बांधल्या आहेत, त्या सर्व प्रकरणांना कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता नियमित मान्यता (डीम्ड रेग्युलरायझेशन) देण्यात येणार आहे तसेच ज्या ठिकाणी परवानगीशिवाय बहुनिवासी इमारती उभारण्यात आल्या आहेत, त्या प्रकरणांचे नियमितीकरण दंडात्मक शुल्क भरून केले जाणार आहे. (पान २ वर..)

## निवडक

### देशात तेल आणि नैसर्गिक वायू उत्खननाचा नवा टप्पा खुला

**नवी दिल्ली :** देशांतर्गत ऊर्जा उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने भारत सरकारने तेल आणि नैसर्गिक वायू उत्खननाचा नवा टप्पा खुला केला आहे. सरकारने ओपन एक्रेज लायसन्सिंग पॉलिसीचा ११वा टप्पा लाँच केला असून याद्वारे सुमारे ८०,२२८ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले २१ ब्लॉक्स लिलावासाठी उपलब्ध करून दिले आहेत. केंद्रीय पेट्रोलियममंत्री हरदीप सिंह पुरी यांनी या उपक्रमाचे वर्णन भारताच्या ऊर्जा प्रवासातील एक "नवा अध्याय" अशा शब्दांत केले आहे.

### इराण-इस्रायल युद्धात भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू

**कुवेत सिटी :** मध्य-पूर्वेतील इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाची झळ केवळ स्थानिक देशांनाच नाही, तर तिथे रोजगारासाठी गेलेल्या भारतीयांनाही सोसावी लागत आहे. इराणने सोमवारी (दि.३०) कुवेतच्या ऊर्जा क्षेत्राला लक्ष्य करून केलेल्या भीषण हल्ल्यात एका भारतीय कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे कुवेतमधील भारतीय समुदायात भीतीचे वातावरण पसरलेले आहे.

# पुण्यात गारपिटीसह जोरदार पर्जन्यवृष्टी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे आणि परिसरात सोमवारी (दि.३०) दुपारनंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. बाणेरसह काही ठिकाणी गारपीटही झाली. रविवारपासून उकाडा प्रचंड वाढलेला असताना पावसाच्या सरींनी तापमानात काही प्रमाणात घट होऊन दिलासा मिळाला आहे.

पुणे शहरात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. दुपारच्या सुमारास बाणेर, शिवाजीनगर, पुणे स्टेशन, हडपसर आणि लोणी काळभोर परिसरात पावसाने जोरदार बरसात केली. बाणेर



भागात पावसाचा जोर अधिक असल्याने सखल भागात पाणी साचले होते. पिंपरी-चिंचवड शहरातही पावसाने अर्धा तास अक्षरशः झोडपून काढले. सकाळपासून सूर्य आणि ढगांचा लपंडाव सुरू होता. त्यानंतर दुपारी आलेल्या पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली.

### राज्यात पुन्हा पावसाचा अंदाज

हवामान विभागाच्या अंदाजानुसार ३० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान राज्यातील हवामानात लक्षणीय बदल होण्याची शक्यता आहे. खान्देश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात दुपारनंतर मेघगर्जनेसह पाऊस, ताशी ३० ते ५० किमी वेगाने जोरदार वादळी वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे १ एप्रिलपासून पावसाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी आज अर्जाचा शेवटचा दिवस

**मुंबई :** शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरण्यासाठी ३१ मार्च शेवटचा दिवस आहे. त्यामुळे ज्या पाल्याचा आरटीई प्रवेशासाठी अर्ज भरला नसेल, तर त्यांचा लवकरात लवकर अर्ज भरावा, असे आवाहन शिक्षण विभागाने पालकांना केले आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेला १७ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. यंदाच्या वर्षी आरटीई कायद्यात तीन किमीऐवजी एक किमी अंतराच्या आतील शाळा निवडाव्या अशी नवीन नियमावली घालण्यात आली होती. नव्या नियमावलीमुळे अनेक विद्यार्थ्यांना आरटीई प्रवेशापासून वंचित राहण्याची वेळ आली होती. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची एक किलोमीटरची अट रद्द केली तसेच घरापासून तीन ते पाच किमीपर्यंत अंतरातील शाळा निवडण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिला. यामुळे विद्यार्थी आणि पालकांना दिलासा मिळाला. अर्जातील दुरुस्तीसाठी तसेच नव्या नियमावलीमुळे ज्या पालकांना अर्ज भरता आला नव्हता, त्यांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आरटीई प्रवेशासाठी अर्ज भरण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस असून अद्याप ही ज्या पालकांनी अर्ज भरले नाहीत त्यांनी लवकरात लवकर अर्ज भरावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# भोंदू अशोक खरातच्या ऑफिसची पुन्हा झडती

**नाशिक : प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरातच्या नाशिकमधील कॅनडा कॉर्नर परिसरातील ओकस प्रॉपर्टीज या कार्यालयाची सोमवारी (दि. ३०) पुन्हा एकदा एसआयटी आणि फॉरेन्सिककडून झडती घेण्यात आली. खरातने याच ठिकाणी १५०हून अधिक महिलांचे लैंगिक शोषण केले होते. त्या चे पुरावे एसआयटीने जप्त केले आहेत.

महिला अत्याचार प्रकरणात नाशिक पोलिसांच्या अटकेत असलेला भोंदूबाबा अशोक खरातबाबत रोज नवनवीन खुलासे होत आहेत. एसआयटीच्या टीमने फिर्यादींना सोबत घेऊन खरातच्या ऑफिसची तपासणी घेतली. यावेळी काही कागदपत्रे, खडे आणि औषधाची बाटली मिळून आल्याची माहिती आहे.

खरातची पोलीस कोठडी मंगळवारी (दि.३१) संपत आहे. त्यामुळे एसआयटीकडून तपासाला आता वेग देण्यात आला आहे. खरातच्या शिवानिका संस्थांचे बँक अकाऊंट सील करण्यात आलेत. एसआयटीकडून मालमत्तेची माहिती मागवण्यात आली आहे. कुटुंबियांच्या नावावर असलेल्या जमीन, घर, दुकानांची चौकशीही सुरू आहे.



**मोबाईल नंबर कोडवर्डमध्ये**

*भोंदू अशोक खरातचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. त्यातील डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहे. मोबाईलमध्ये अडीच हजारांहून अधिक नंबर कोडवर्डमध्ये सेव्ह आहेत. प्रभावशाली व्यक्तींची नावे 'डमी' स्वरूपात सेव्ह करण्यात आल्याचा संशय पोलिसांना आहे, तर खरात पीडित महिलांशी संपर्क साधण्यासाठी वेगळ्या मोबाईलचा वापर करत होता, अशी माहितीही समोर आली आहे.*

# पनवेल महापालिकेचे ४८५३ कोटींचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर; सर्वांगीण विकासावर भर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अंदाजित जमा व खर्चाचे विविरण पत्र सोमवारी (दि.३०) स्थायी समितीच्या विशेष सभेत आयुक्त मंगेश चितळे यांनी स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्याकडे सादर केले. या विवरणपत्रात महापालिका परिसराच्या सर्वांगीण विकासावर भर देत पायाभूत सुविधा विकास, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, स्वच्छता, शिक्षण तसेच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, सचिव नानासाहेब कामठे, लेखा अधिकारी



संग्राम व्होरकाटे, स्थायी समितीचे सर्व सदस्य, उपमुख्यलेखा परीक्षक संदीप खुरपे उपस्थित होते.

सन २०२६-२७च्या अंदाजपत्रकानुसार जमा-खर्चाच्या बाबींचा तपशील पाहता एकूण जमा चार हजार ८५३ कोटी ९० लाख (आरंभी शिलकीसह) रुपये इतके असून एकूण खर्च चार हजार ८५३ कोटी ८० लाख रुपये इतका आहे. अखेर शिल्लक रुपये १० लाख इतकी आहे.

खर्चाच्या बाबतीत आस्थापना खर्चासाठी १९३ कोटींची तरतूद करण्यात आली असून नवीन प्रशासकीय इमारतीसाठी तब्बल २०० कोटी राखीव ठेवण्यात आले आहेत. (पान २ वर..)

### ■ वाढीव तरतूद

मागील वर्षीच्या अंदाजपत्रकापेक्षा यंदा काही विभागांमध्ये वाढीव तरतूद करण्यात आली आहे. यात दिव्यांग कल्याण (१५ कोटी), प्राथमिक शिक्षण (११० कोटी), वैद्यकीय आरोग्य (८९ कोटी), पाणीपुरवठा व्यवस्था (१४२.५ कोटी), घनकचरा व्यवस्थापन (२७ कोटी), अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थापन (३६ कोटी), महिला व बालकल्याण (१० कोटी), समाजविकास व मागासवर्गीय कल्याण (१८ कोटी) इतकी तरतूद करण्यात आली आहे. महापालिकेने सादर केलेले हे अंदाजित जमा व खर्चाचे विवरणपत्र शहराच्या पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण यांचा समतोल साधत विकासाला चालना देणारे ठरेल, असे आयुक्त मंगेश चितळे यांनी म्हटले आहे.

# नव्या आर्थिक वर्षात होणार अनेक बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन आर्थिक वर्षापासून म्हणजेच १ एप्रिलपासून आयकर ते रेल्वे तिकिटांपर्यंत अनेक बदल लागू होणार आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षात होणारा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आयकर कायदा हा आहे.

१ एप्रिलपासून १९६१च्या जुन्या कायद्याच्या जागी नवीन आयकर कायदा लागू होईल. अनेक करदात्यांसाठी यामुळे आयकर विवरणपत्र दाखल करण्याची प्रक्रिया कमी गुंतागुंतीची आणि अधिक स्पष्ट होण्यास मदत होऊ शकेल.

टीडीएस कपात ट्रॅक करण्यासाठी आता 'फॉर्म १३०'चा वापर करण्यात येणार आहे. हा फॉर्म नोकरदारांना त्यांच्या नियोयांकडून (संस्था) दिला जाईल, तर काही विशिष्ट



बँका पात्र ज्येष्ठ नागरिकांना हा फॉर्म उपलब्ध करून देतील. एकदा टीडीएसची कपात होऊन ती रक्कम जमा झाली की हे प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य ठरते, ज्यामुळे करदात्यांना त्यांच्या कर-कपातींचा अधिक स्पष्टपणे ट्रॅक करणे शक्य होते.

बँका त्यांच्या काही दैनंदिन नियमांमध्ये सुधारणा करत आहेत. एचडीएफसी बँक रोख पैसे काढण्यासीठी यूपीआय आधारित एटीएमसुविधेचा पाच वेळा मोफत वापर केल्यानंतर त्यानंतरच्या प्रत्येक व्यवहारासाठी २३ रुपये शुल्क आकारण्यास सुरुवात करणार आहे. पंजाब नॅशनल बँक काही विशिष्ट डेबिट कार्ड्ससाठी पैसे काढण्याची मर्यादा कमी करत आहे. अनेक प्रकरणांमध्ये ही मर्यादा आता ५० हजार ते ७५ हजार रुपयांच्या दरम्यान असेल, जी पूर्वीच्या तुलनेत कमी करण्यात आली आहे.

भारतीय रेल्वेने आता नियमांमध्ये बदल केला असून आधी गाडी सुटण्याच्या चार तास आधीपर्यंत तिकीट रद्द केल्यास परतावा मिळत असे, मात्र आता गाडी सुटण्याच्या आठ तासांच्या आत तिकीट रद्द केल्यास कोणताही परतावा मिळणार नाही.

पॅन कार्डसाठी अर्ज करताना आता जन्म तारखेचा अधिक स्पष्ट पुरावा सादर करणे अनिवार्य असेल. अधिकृत नोंदींची अचूकता सुधारणे हा या बदलामागील मुख्य उद्देश आहे.

# एफआयआरपासून चार्जशीटपर्यंतची सर्व प्रक्रिया सहा महिन्यांत पूर्णपणे होणार डिजिटल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस दलाला तंत्रज्ञानाने अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. गुन्हेगारी तपासात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) आणि 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, पुढील सहा महिन्यांत एफआयआरपासून ते दोषारोपपत्रापर्यंतची (चार्जशीट) सर्व प्रक्रिया पूर्णपणे 'डिजिटाइज' करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.३०) दिली.

मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात सोमवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक



परिषद पार पडली. या परिषदेला संबोधित केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कृती आराखडा मांडला. केंद्र सरकारने राज्यांच्या तांत्रिक प्रगतीसाठी दिलेल्या १०६ मुद्द्यांच्या पालनात महाराष्ट्र अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. "आता आपण पुराव्यांच्या व्यवस्थापनासाठी 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. यामुळे डिजिटल पुराव्यांची सुरक्षितता वाढेल आणि त्यात कोणताही बदल करणे कोणालाही शक्य होणार नाही. ही यंत्रणा येत्या सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यान्वित करण्याच्या सूचना पोलीस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत," असे त्यांनी सांगितले.

राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण सध्या ५० टक्क्यांच्या आसपास आहे, ते ९५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. यासाठी गेल्या ४ ते ५ वर्षांतील प्रकरणांचे 'एआय'च्या माध्यमातून विश्लेषण करण्याचे काम गुन्हे अन्वेषण विभागाला (सीआयडी) सोपवण्यात आले आहे. विशेषतः सत्र न्यायालयांमधील निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष रणनीती आखली जात असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थांच्या तस्करी आणि विक्रीविरुद्ध राज्यात लवकरच एक मोठी मोहीम उघडली जाईल. पोलीस महासंचालक यासंदर्भातील सविस्तर रणनीती लवकरच सादर करणार आहेत, असे फडणवीस म्हणाले.

## मुलीवर अत्याचार करणाऱ्या तरुणाला नेपाळ सीमेवर अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील एका 13 वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात खारघर पोलिसांना यश आले आहे. विशाल बाबू उर्फ अन्वर अली इम्तियाज अन्सारी (24) असे या आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला भारत-नेपाळ सीमेवरून शिताफीने अटक केली आहे. न्यायालयाने या आरोपीला 1 एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

खारघरमधील जगदीश ऑटोपार्ट्स या गॅरेजमध्ये काम करणाऱ्या विशाल चावू याने ऑक्टोबर 2025 मध्ये पीडित मुलीला गॅरेजमध्ये बोलावून तिच्यावर अत्याचार केले होते. कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन त्याने पीडित मुलीवर

अनेकवेळा लैंगिक अत्याचार केले होते. त्यामुळे पीडित मुलगी गर्भवती राहिल्याचे समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली होती. त्यानंतर पीडित मुलीच्या पालकांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर आरोपी हा उत्तर प्रदेशातील कुशीनगर या आपल्या मूळ गावी पळून गेला होता. पोलिसांनी उत्तर प्रदेशात जाऊन नातेवाईकांवर दबाव निर्माण करून आणि त्यांना विश्वासात घेऊन सलग 13 दिवस कुशीनगर, गोरखपूर आणि नेपाळ सीमा परिसरात शोधमोहीम राबवली होती

## मार्च एन्ड : कामांची बिले काढण्यासाठी गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेत मार्च महिन्याच्या अखेरीस विकास कामांची बिले काढण्यासाठी आणि आर्थिक वर्षाची सांगता करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर मोठी धावपळ सुरू आहे. वर्षभरात केलेल्या विकासकामांची बिले आणि खर्च काढण्यासाठी अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषद कार्यालयात ठेकेदारांची मोठी गर्दी असल्याचे चित्र पहावयास मिळते आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना शासनाकडून मिळालेला निधी मार्चअखेर खर्च करणे बंधनकारक असते. हा निधी खर्च न झाल्यास शासनाकडे परत जाण्याची भीती असते. त्यामुळे सर्व विभागप्रमुख 100 टक्के निधी विनियोगासाठी प्रयत्नशील आहेत. सध्या जिल्हा परिषदेत विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे, झालेल्या कामांची बिले काढणे आणि खर्च खतावणी पूर्ण करणे, अशी कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. त्यामुळे रविवारी सुटीच्या दिवशीदेखील अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयांमध्ये हजर होते. येथील जिल्हा परीषद कार्यालयाच्या बाहेर ठेकेदारांच्या वाहनांची गर्दी पहायला मिळत आहे.

वर्षअखेच्या टप्प्यात अर्थ व बांधकाम विभागात बिले मंजूर करुन घेण्यासाठी ठेकेदारांची मोठी गर्दी होत आहे. यात सुशिक्षित बेरोजगार नोंदणीकृत ठेकेदारांचा भरणा अधिक आहे. काही ठिकाणी ठेकेदार स्वतः फायली घेऊन अधिकाऱ्यांच्या कक्षात जाताना दिसत आहेत. बिले खर्ची टाकण्यासाठी आणि पगार मिळावेत, यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयात कर्मचाऱ्यांची गर्दी होत असून, बिलांची संख्या वाढलेली आहे. कोषागार कार्यालयात रेलचेल आहे. सर्वच कार्यालयांची वर्षाचा निधी खर्ची पडावा आणि त्याची बिले मिळावीत, यासाठी तारांबळ सुरू आहे. कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बिले, प्रवास भत्ते, स्टेशनरी बिले, पुढील वर्षासाठी खरेदी, शासकीय वाहनांवरील दुरुस्तीचा खर्च आर्दीची बिलांसाठी कोषागार कार्यालयात सादर करण्यासाठी धावपळ सुरु आहे.

सर्वच कार्यालयांमध्ये सध्या ठेकेदारांचीच गर्दी दिसून येत आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही प्रशासनाची धावपळ सुरु असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. रस्ते तसेच इतर बांधकामांची बिले मंजूर करून ती खर्ची घालण्यासाठी ठेकेदारांची बांधकाम विभागात मोठ्या प्रमाणात धावपळ सुरु आहे.

# तेजस उपक्रमातून इंग्रजी शिक्षणाची क्रांती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'तेजस' (TAG) उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या तालुका व केंद्र समन्वयकांचा भव्य सत्कार सोहळा नुकताच पार पडला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), रायगड यांच्या वतीने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नुकतेच या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

वर्ष 2025-26 मध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील केंद्रातून एका शिक्षकाची 'समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या समन्वयकांनी ऑनलाइन मीटिंगच्या माध्यमातून मार्गदर्शन घेऊन केंद्र स्तरावर प्रत्येक शाळेतील शिक्षकांना इंग्रजी विषयाचे क्षमतानिहाय प्रशिक्षण दिले. यामुळे जिल्हाभरातील शाळांमध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन अधिक प्रभावी होण्यास




मदत झाली आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेश विष्णू येवले (प्रमुख, इंग्रजी विभाग, सी.के.टी. कॉलेज) आणि मोहनजी कोनगिरे (विभागीय प्रमुख, रायगड रयत शिक्षण संस्था) उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या रत्नप्रभा भालेराव, प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले आणि अधिव्याख्याता सुवर्णा तोरणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी कामशेट्टी सर, इनामदार सर, निंबाजी गीते, सौरभ पांडकर, भाग्यश्री खाडिलकर यांसह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व उपस्थित टॅग (TAG) समन्वयकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सुधागड तालुक्यातून या उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जनार्दन भिलारे, प्रियंका ठोकळ, राणी कदम, स्वाती हंडोरे, राकेश गदमले आणि वैशाली चौधरी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच गोरख आघाव, अमोल ठोकळ, राजेश इंदुलकर, मोनिका गोडसे, योगिता भौड आणि जगदीश जाधव यांनीही समन्वयक म्हणून मोलाची भूमिका बजावली. सुधागड तालुक्यातील या यशासाठी गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, सर्व केंद्रप्रमुख आणि इंग्रजी विषय साधनव्यक्ती प्रविणा खैरे यांचे विशेष सहकार्य लाभले. या गौरव सोहळ्यामुळे सर्व टॅग समन्वयकांचे कौतुक होत आहे.

## थर्मल मॅमोग्राफीद्वारे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ आणि पुष्पक चिरमाडे कॅन्सर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून थर्मल मॅमोग्राफीद्वारे मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात कॅन्सर तज्ज्ञ डॉ. पुष्पक चिरमाडे (MD, DM Oncology) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सौ. विजया सावंत, प्रिया खोबरेकर आणि प्रीता भोजने यांनी शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी विशेष मेहनत घेतली. मंडळातील महिला भगिनींनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोलाची साथ दिली.

यावेळी डॉ. ज्योती चिरमाडे (MD, DM Hemato-Oncologist) यांनी स्तन कर्करोगासह विविध कॅन्सरचे उपचार, तसेच मानसिकदृष्ट्या खंबीर राहून या आजारावर मात कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले.

मालती चिरमाडे यांनी महिलांनी आपल्या जीवनशैलीत योग्य बदल करून वयोमानानुसार आरोग्य सुदृढ कसे ठेवावे, याबाबत उपयुक्त माहिती दिली.

या शिबिरात एकूण 46 महिलांनी थर्मल मॅमोग्राफी तपासणी करून घेतली. सर्व तपासण्या पुष्पक चिरमाडे कॅन्सर सेंटरतर्फे पूर्णतः मोफत करण्यात आल्या. याबद्दल संघाचे अध्यक्ष केशव राणे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रम कौटुंबिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून, महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम यशस्वी ठरला.




**पनवेल : महानगरपालिका शाळा क्रमांक ७ तक्का या मराठी शाळेमध्ये इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे शाळेला शैक्षणिक प्रगतीसाठी वेळोवेळी अनेक भेट दिली जातात. त्याच्यापैकी आज डिजिटल डॉल भेट देण्यात आलेली आहे. या कार्यक्रमासाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष शुभांगी पिंपळकर, सेक्रेटरी डॉ. अमृता नाईक, खजिनदार अवंतिका मारूळुकर तसेच सदस्य मंजिरी नांदेडकर, प्रिया कुलकर्णी उपस्थित होत्या. अध्यक्ष पिंपळकर यांच्या हस्ते आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या सावळे व शिक्षकांना डिजिटल डॉल सुपूर्द करण्यात आली.**

## वरंध ग्रामपंचायतीला आर.आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार; दहा लाखांचे पारितोषिक

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या तालुका स्तरावरील आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेसाठी सन 2023-24 या वर्षाकरिता महाड तालुक्यातील वरंध ग्रामपंचायत यांची निवड करण्यात आल्याची माहिती शासकीय स्तरावरून जाहीर करण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत वरंध ग्रामपंचायतीला दहा लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पूर्वीच्या स्मार्ट ग्राम योजनेचे नामांतर करून ही योजना आता आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव योजना म्हणून लागू करण्यात आली आहे. या योजनेसाठी सन 2025-26 आर्थिक वर्षात सुमारे दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

प्राप्त अनुदानातून संबंधित ग्रामपंचायतीने विविध विकासात्मक व अभिनव उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्येअपारंपारिक ऊर्जा प्रकल्प,स्वच्छतेसंदर्भातील अभिनव उपक्रम,महिला सक्षमीकरण व बालमैत्री प्रकल्प,स्वचछ पाणी वितरण व्यवस्था,भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) प्रसार,आंतरराष्ट्रीय मानदंडांनुसार गुणवत्ता वाढ प्रकल्प,सौर पथदिवे बसविणे,

सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी कुंपण,ग्रामपंचायत स्तरावर इंटरनेट व वाय-फाय सुविधा,या योजनांवर मंजूर निधी प्रभावीपणे खर्च करण्याच्या सूचना शासनामार्फत देण्यात आल्या आहेत. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध राजकीय, सामाजिक संस्थांकडून तसेच वरंध ग्रामपंचायतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पान १ वरुन

## सिडको हद्दीतील बंगलो, रो-हाऊस प्लॉटवरील बहुनिवासी इमारती होणार नियमित!

यामध्ये निवासी वापरासाठी प्लॉट क्षेत्रफळाच्या राखीव किमतीच्या २५ टक्के, तर व्यावसायिक वापर असलेल्या प्रकरणांसाठी १५० टक्के एकरकमी शुल्क आकारले जाणार आहे. नियमितीकरणानंतर संबंधित घरांना स्वतंत्र युनिट म्हणून मान्यता देण्यात येईल. त्यामुळे मालमत्तेचे हस्तांतरण, गहाण ठेवणे (मॉर्गेज) आणि बँक व्यवहार सुलभ होणार आहेत. दरम्यान, विद्यमान इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी (रिडेव्हलपमेंट) प्रथम नियमितीकरण आवश्यक राहील. त्यानंतर प्रचलित यूडीसीएपीआर/डीसीआर नियमांनुसार पुनर्विकासास परवानगी दिली जाईल. पुढे या प्लॉटचा वापर निवासी स्वरूपातच मानला जाणार आहे. याशिवाय, भिन्न मालकांचे बंगलो किंवा रो-हाऊस प्लॉट एकत्र करून (अमलगमेशन) विकास करण्यासही सिडकोने प्रोत्साहन दिले आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ करण्याचे अधिकार सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले असून कार्यवृत्ताच्या पुष्टीची प्रतीक्षा न करता हा निर्णय लागू करण्यात येणार आहे. यामुळे नवी मुंबईतील प्रलंबित प्रकरणांना गती मिळून रहिवाशांच्या मालकी हक्क, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळ अडकलेल्या प्रकरणांना गती मिळणार असून नागरिकांच्या मालकी हक्क, पुनर्विकास आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित अडचणी मोठ्या प्रमाणात दूर होणार आहेत. या निर्णयाचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल तसेच सिडको प्रशासनाबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## पनवेल महापालिकेचे ४८५३ कोटींचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर; सर्वांगीण विकासावर भर

शहरातील होल्डिंग पॉन्डसाठी ६० कोटी तसेच बहुउद्देशीय समाजमंदिर बांधकामासाठी ४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करत दैनंदिन बाजार विकसित करण्यासाठी ६४ कोटी, गावठाण परिसरातील पायाभूत सुविधांसाठी ६१ कोटी, घनकचरा संकलन, वाहतूक व मनुष्यबळ व इतर अनुषंगिक बाबी यांच्यासाठी ३१८ कोटींची मोठी तरतूद करण्यात आली आहे.

वैद्यकीय व आरोग्य सेवांसाठी १९४ कोटी, अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थेसाठी ८३ कोटी तसेच रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरणासाठी ३५८ कोटींचा निधी प्रस्तावित आहे. शिलार धरण प्रकल्पासाठी १५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मलनिस्सारण व पाणी पुनर्वापर प्रक्रिया केंद्र व इतर कामांसाठी ११५ कोटींची तरतूद, विद्युत व्यवस्थेसाठी १४७ कोटी, भुयारी गटार व मलनिस्सारणासाठी १६४ कोटी, शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षणासाठी १७४ कोटी, माहिती व तंत्रज्ञानासाठी १४३ कोटी तसेच शासकीय अमृत योजनेंतर्गत विविध विकासकामांसाठी ११७ कोटींचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. याशिवाय भूसंपादन, सार्वजनिक सुविधा आणि नगररचना यासाठीही मोठ्या प्रमाणात निधी प्रस्तावित आहे.

## महड तीर्थक्षेत्र परिसरात पोल्ट्रीमधील शिल्लक कचरा उघड्यावर; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**खोपोली : प्रतिनिधी**

पोल्ट्रीतला शिल्लक कचरा, मृत कोंबड्यांचे अवयव महड परिसरात पाताळगंगा नदीकिनारी उघड्यावर टाकण्यात येत असून महडसह तीन ते चार किलोमीटर परिसरात दुर्गंधी पसरत आहे.


नगरपंचायत खालापूर हद्दीत अष्टविनायक पैकी एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेले महड गणपती मंदिर आहे. महड हद्दीत गुरु चरण जागा शेकडो एकर आहे .मोठ्या प्रमाणात गुरचरण जागा पातळगंगा नदीकिनारी आहे. या ठिकाणी जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. या भागात उघड्यावर पोल्ट्रीतला शिल्लक कचरा ,मृत कोंबड्या तसेच इतर घाण पिकअप मधून आणून टाकण्यात येते. अशा प्रकारचा कचरा विल्हेवाट योग्य रीतीने लावणे आवश्यक असताना उघड्यावर टाकल्याने दुर्गंधी हवेत पसरत आहे.

याशिवाय भटके श्वान ही घाण खाण्यासाठी जमा होत असून नदीपात्रात देखील घाण जात असल्याने पाणी दूषित होत आहे. पाताळगंगा नदीवर अनेक गावांच्या पेयजल योजना आहेत. अशाप्रकारे घाण नदीत जात असल्याने रोगराई पसरण्याची भीती आहे .याशिवाय हवेच्या दिशेप्रमाणे दुर्गंधी मंदिर तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात पसरत असल्याने दूरवरून येणारे भाविक परिसरातील नागरिक यांना त्रास सहन करावा लागतो. तीर्थक्षेत्र परिसरात अशा प्रकारे दुर्गंधीस जबाबदार इसमावर फौजदारी कारवाई ची मागणी नागरिक करत आहेत.

### दुखवटा

## अनंत म्हात्रे

**नवी मुंबई :** नेरुळगावातील आदर्श शिक्षक अनंत शंकर म्हात्रे गुरुजी ( वय वर्षे 85 ) यांचे



रविवारी दुःखद निधन झाले. नेरुळगावातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक,सांस्कृतिक, शैक्षणिक, कला - क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, तीन भाऊ, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## निवडक

### मोटारीच्या काचा फोडणाऱ्याला अटक

**पनवेल :** खारघर परिसरात, विशेषता इस्कॉन मंदिर परिसरात उभ्या असलेल्या मोटारीच्या काचा फोडून होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिक हैराण झाले होते, खारघर पोलिसांनी अत्यंत कौशल्याने सापळा रचून या टोळीतील मुख्य सूत्रधाराला नुकतीच अटक केली आहे. या कारवाईमुळे केवळ खारघरच नव्हे, तर सीबीडी, पनवेल शिळ डायघर आणि मिरा-भाईंदरमधील 7 गुन्हे उघडकीस आले आहेत. खारघर इस्कॉन मंदिर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोटारोंच्या काचा फोडून आतील मौल्यवान ऐवज लंपास करण्याचे प्रमाण वाढले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने या परिसरात सापळा रचला. चोरी करण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी रज्झा उर्फ रझाक इसरार खान (36)या आरोपीवर झडप घालून त्याला ताब्यात घेतले.

### कंपनीतून ऐवजाची चोरी

**पनवेल :** नवीन पनवेल कंपनीचे लॉक तोडून अज्ञात चोरट्यांत तेथून 65 हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलीय ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.शिफा हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड, तळोजा, एमआयडीसी या कंपनीच्या दरवाजाचे लॉक तोडून चोरांनी आतमध्ये प्रवेश केला आणि औषधे बनवण्याचे व पॅकिंग करण्याचे मशीनचे स्पेअरपार्टचे बॉक्स, कॉपर केबल, कॉपर पाइप लाइन, कोपर कॉम्प्रेसरचे बॉक्स, आदी ऐवज चोरून नेल्याची तक्रार या कंपनीच्या वतीने तळोजा पोलीसठाण्यात देण्यात आली आहे.

### सिमेंट गोणींचा अपहार

**पनवेल :** नवीन पनवेल एका ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील 4 हजार 880 रुपयांच्या सिमेंटच्या 120 बैंगांचा अपहार केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली येथील कंपनीमधून सिमेंटच्या 240 बंगा पश्चिम येथे घेऊन जाण्यासाठी भरल्या होत्या, मात्र त्याने 120 सिमेंट बॅग खाली केल्याचे चलन पाठवले. उर्वरित सिमेंटच्या 120 बॅग सापडू आल्या नाहीत.

# एक मुलाखत : यशस्वी माजी विद्यार्थ्यांची

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील उपक्रमशील विद्यालय अशी ओळख असणाऱ्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'एक मुलाखत - यशस्वी माजी विद्यार्थ्यांची ' या नाविन्यपूर्ण नवोक्रमात विद्यालयाचे प्रेरणास्थान रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांची अत्यंत माहितीपूर्ण व खुमासदार मुलाखत घेतली.

या विद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून ह्या क्षणाला आपल्या नेमक्या भावना काय आहेत ?' ह्या बाल मुलाखतकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना लोकनेते रामशेठ ठाकूर हळवे व भावूक होत म्हणाले," माझे अनेक ठिकाणी हजारो लाखो सत्कार झाले परंतु मी ज्या शाळेत शिकलो,घडलो त्या विद्यालयात माझ्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ही मुलाखत संपन्न होतेय,माझा सत्कार होतोय याच्यासारखा आनंद नाही,याची बरोबरी दुसऱ्या कुठलाही सत्काराला किंवा मुलाखतीला येणार नाही असे भावनिक उद्गार काढून प्रचंड हळवे झाले

विद्यालयाचे माजी विद्यार्थी व आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ



### शालेय विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखतीत लोकनेते रामशेठ ठाकूर झाले भावूक

मॅनेजिंग कौन्सिल सदस्य सदस्य,सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,क्रीडा,कला,राजकीय व उद्योग क्षेत्रातील दानशूर बहुआयामी व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मुलाखतीने या विशेष उपक्रमाच्या मालिकेचे तिसरे पुष्प गुंफले.लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ' रामपर्व ' ह्या सांस्कृतिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ही मुलाखत संपन्न झाली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सामाजिक,राजकीय,शैक्षणिक व उद्योगक्षेत्रातील प्रेरणा कोणाकडून मिळाली ,कामाच्या व्यग्रतेतून कुटुंबासाठी कसा वेळ देता,प्रशासकीय अनुभव,समाजोपयोगी कामे,तरूणांना संदेश,बालपणीच्या आठवणी, शालेय जीवनातील अनुभवावर आधारीत वैविध्यपूर्ण व कुतुहलपूर्ण प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले.मुलाखतकार विद्यार्थ्यांमध्ये आरोही नाळे, स्मीत मोकल,कपिल सोनकांबळे,अभिलाषा म्हात्रे,आदिती पाटील,सात्विक भोईर,सिद्धांती सुतार,व प्रज्वल कोरेकर यांचा समावेश होता.त्यांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्ण मुलाखत घेतली.

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब खरंतर हे हिमालया इतके उत्तुंग व्यक्तिमत्व परंतु मुलाखतकाराच्या भूमिकेत वावरणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना अत्यंत समर्पक,हसत खेळत,मनमोकळेपणाने आणि मिश्किलपणे तर आंदोलनाची आक्रमकता दाखवतानाचा कणखर बाणा, संसदेमधील अनुभव कथन करताना मंत्रीपदाच्या प्रलोभनांना बळी न पडता दर्शविलेला प्रामाणिकपणा तर कधी हळवेपणाने भावूक होत आपल्या स्वभावातील मृदूता व तरल स्वभावाचे प्रदर्शन करीत सहजपणे उत्तरे दिली.

यावेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत,संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम.म्हात्रे व महेंद्रशेठ घरत, जुनिअर कॉलेज विभागाचे स्थानिक शाळा समितीचे सदस्य व जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख,वहाळ साई संस्थानचे अध्यक्ष रविशेठ पाटील,विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर,विश्वनाथ कोळी,अॅड.राहुल घरत व विजयशेठ घरत तसेच भार्गव ठाकूर,वसंतशेठ पाटील,एम.डी.खारकर,बी.टी.कांबळे गुरूजी,रत्नप्रभा घरत,रघुनाथ देशमुख,राम मोकल,योगिता भगत,मिनाक्षी पाटील,सुहास भगत,हेमंत ठाकूर,किशोर पाटील,निलेश खारकर,धीरज ओवळेकर,साईचरण म्हात्रे,सुधीर ठाकूर,जयवंतराव देशमुख,वैभव घरत,उत्तम कोळी,कामिनी कोळी,विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवळकर,पर्यवेक्षिका प्रणिता गोळे आदी मान्यवर,पंचक्रोशीतील ग्रामस्थ,शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## आमदार महेश बालदी यांच्या निधीतून कामठा अंतर्गत रस्त्याचे लोकार्पण

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नातून आणि आमदार स्थानिक विकास निधी (2025-26) अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील कामठा अंतर्गत रस्त्याचे उद्घाटन रविवार ( दि. 29) मार्च रोजी आमदार महेश बालदी याच्या हस्ते झाले. अंदाजे 25 लाख रुपये खर्चून साकारलेल्या या विकासकामामुळे परिसराच्या विकासाला नवी गती मिळाली आहे.



हा रस्ता केवळ अंतर्गत दळणवळणासाठीच नाही, तर नागाव व म्हातवली या भागाला जोडणारा एक महत्त्वाचा मार्ग ठरणार आहे. उरण शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, हा बाह्य रस्ता (बायपास) म्हणून अत्यंत उपयोगी पडणार असून, यामुळे प्रवाशांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत.

यावेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक राजेश ठाकूर , ठाकूर, सायली म्हात्रे, दमयंती म्हात्रे, सायली पाटेकर आणि गणेश पाटील आदि उपस्थित होते ,त्याच बरोबर सीमा घरत विशाल पाटेकर, देवेंद्र घरत, निलेश पाटील, दीपक ठाकूर, राज दीपक ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

या रस्त्याच्या कामाचे कंत्राटदार (कॉन्ट्रॅक्टर) म्हणून राज ठाकूर यांनी दर्जेदार काम पूर्ण केले आहे.आमदार निधीतून हा महत्त्वपूर्ण रस्ता उपलब्ध झाल्याबद्दल चाणजे, कामठा, नागाव आणि म्हातवली परिसरातील ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. आहेत.

## नियमबाह्य २८ निवृत्त अधिकाऱ्यांची सेवा समाप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाने प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी पाच वर्षा पूर्वी विविध संवर्गातील अनेक सेवा निवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक केली होती होती.परंतु महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त 3 वर्षा सेवा काळ असल्याचे नियम असताना व त्यांचे कार्यकाळ संपल्यानंतर ते नियमबाह्य पद्धतीने काम करत होते व पालिकेच्या आस्थापना विभागाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून या सेवानिवृत्त 28 अधिकाऱ्यांची सेवा सुरू ठेवून जनतेच्या पैशाचे अपव्यय केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर ही बाब गंभीर असल्याने पालिकेच्या पर्यायाने जनतेच्या पैशाची उधळपट्टी चुकीच्या पद्धतीने होत असल्याने प्रहारने पनवेल आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन या प्रकरणी सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली होती. या प्रकरणी प्रहारच्या वतीने पालिका आयुक्तांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्या नंतर आस्थापना विभागाने या नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या 28 सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना नोटीस बजावून अखेर त्यांची सेवा समाप्ती करण्याचे आदेश निर्गमित केले असल्याची माहिती डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा उपाध्यक्ष रायगड प्रहार जनशक्ती पक्ष यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## सौर प्रकल्प, आधुनिक महिला सुविधा केंद्र उभारण्याची सभापती ममता म्हात्रे यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे यांनी आज महापौरांकडे दोन महत्त्वपूर्ण व दूरदृष्टीपूर्ण प्रस्ताव निवेदनाद्वारे सादर केले.

यामध्ये "महिला सन्मान स्वच्छता अभियान" अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अत्याधुनिक पिंक टॉयलेट्स (महिला सुविधा केंद्र) उभारण्याचा व्यापक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ही केंद्रे केवळ सार्वजनिक स्वच्छतागृह नसून महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य व सन्मान लक्षात घेऊन विकसित केलेली बहुउद्देशीय सुविधा केंद्रे असतील.

या पिंक टॉयलेट्समध्ये आधुनिक व स्वच्छ शौचालयांसोबतच सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन, वापरलेल्या नॅपकिन्सच्या सुरक्षित विल्हेवाटीसाठी इन्सिनरेटर, तसेच स्तनपान करणाऱ्या मातांसाठी स्वतंत्र 'हिरकणी कक्ष' उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने केंद्रांच्या बाह्य भागात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात



येईल तसेच २४ तास महिला रक्षकांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव आहे.

या सुविधा केंद्रांमध्ये सौर ऊर्जा वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन (Rainwater Harvesting) आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळण्यासाठी पॅनिक बटण (Emergency Alarm) यांसारख्या स्मार्ट सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

शहरातील प्रमुख वर्दळीची ठिकाणे जसे की रेल्वे स्थानके, बाजारपेठा, बस स्थानके, उद्याने व शासकीय कार्यालय परिसर येथे पहिल्या टप्प्यात 25 ते 50 पिंक टॉयलेट्स उभारण्याचा आराखडा सादर करावा अशी मागणी केली आहे.

तसेच राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान व हरित ऊर्जा धोरण अंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गृहसंकुलांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबतही विस्तृत प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रकल्पाद्वारे सोसायटी स्तरावर वीज निर्मिती, कॉमन सुविधांसाठी ऊर्जा पुरवठा, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा तसेच नेट मीटरिंगचा वापर यांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वीज खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना मिळणार आहे.

या दोन्ही प्रकल्पांसाठी PPP (Public-Private Partnership) व CSR निधीचा वापर करण्याचा प्रस्ताव असून, स्थानिक महिला बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.ममता म्हात्रे यांनी या प्रस्तावांमुळे पनवेल शहरात महिला सुरक्षा, स्वच्छता व हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मोठी प्रगती होऊन शहर "मॉडेल सिटी" म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच संबंधित विभागांना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून हे प्रकल्प तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

## पोस्ट कार्यालयाच्या स्थलांतर प्रक्रियेला येणार वेग

**उरण : बातमीदार**

उरण शहरातून ग्रामीण भागात हलवण्यात आलेले पोस्ट कार्यालय पुन्हा एकदा शहरात परत आणण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यासाठी लवकरच करार करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र रायगड जिल्हा किसान सभेचे सचिव संजय ठाकूर यांना पोस्टाच्या वाशी विभागाकडून देण्यात आले आहे. यामुळे पोस्ट कार्यालयावर अवलंबून असणाऱ्या ज्येष्ठांची परवड, होणारा त्रास आता लवकरच थांबणार आहे.

उरणचे पोस्ट कार्यालय सध्या शहरापासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या जेएनपीए कामगार वसाहतीत स्थलांतरित करण्यात आलेले आहे. त्यामुळे नागरिकांना पोस्टातील दैनंदिन व्यवहार करण्यासाठी भर उन्हाळ्यात सहा किलोमीटर लांब ये-जा करावी लागते. याचा अधिकचा आर्थिक भुर्दंड आणि शारीरिक त्रास ज्येष्ठांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे पोस्ट विभागाने हे कार्यालय लवकरात लवकर उरण शहरात सुरू करण्याची मागणी जोर धरत होती. उरण येथील पोस्ट कार्यालयात मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे.

## 'एसआयआर'च्या उरण विधानसभा प्रमुखपदी डॉ.अविनाश गाताडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या मतदार पुनर्निरीक्षण (SIR) अभियानासाठी भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशतर्फे १९०- उरण विधानसभा क्षेत्राचा BLA-१ (विधानसभा प्रमुख) म्हणून डॉ. अविनाश गाताडे यांची नियुक्ती केल्याचे पत्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिले आहे


ही नियुक्ती आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी बाब आहे. त्यांच्या नेतृत्वातून संघटन अधिक बळकट होऊन कार्याला नवी गती मिळेल, असा विश्वास आहे असे म्हणत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी डॉ. अविनाश गाताडे यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले आहे.

# एकवीरा देवी पालखी सोहळ्यात आम्ही संयम राखला!

## पनवेल कोळीवाड्यातील नागरिकांनी स्पष्ट केली भूमिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई एकवीरेच्या पालखी सोहळ्यात झालेल्या वादप्रकरणी पनवेल कोळीवाडा येथील भक्तांनी आपली भूमिका स्पष्ट करत घडलेल्या घटनेबाबत सत्य परिस्थिती मांडली आहे. आम्हाला कोणताही वाद निर्माण करायचा नव्हता, उलट सोहळा शांततेत आणि जल्लोषात पार पडावा यासाठी आम्ही शेवटपर्यंत प्रयत्न केले, असे त्यांनी ठामपणे सांगितले.



पनवेल कोळीवाड्यातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार पालखी सोहळा सुरळीत पार पडावा यासाठी तिन्ही कोळीवाड्यांमध्ये वारंवार बैठका घेण्यात आल्या होत्या. या बैठकीत पनवेल कोळीवाड्यातील पंच कमिटीचे सदस्य सातत्याने उपस्थित राहून सविस्तर चर्चा केली होती. आईच्या पालखी सोहळ्याला कोणताही गालबोट लागू नये, हा सोहळा देदीप्यमान आणि जल्लोषपूर्ण व्हावा, या उद्देशाने पनवेल कोळीवाड्याने समय राखत पूर्ण प्रयत्न केले.

आई-बहिणींसह सर्व समाजबांधवांनी आर्थिक जुळवाजुळवपासून ते पालखी सजावटीपर्यंत अत्यंत



नियोजनबद्ध काम केले होते, मात्र सोहळा सुरू असतानाच कल्याण कोळीवाड्यातील काही समाजकंटकांनी अचानक दगडफेक करत वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पनवेल कोळीवाड्यातील नागरिकांनी केला आहे.

आमच्यावर आणि आमच्या आई-बहिणींवर दगडफेक झाली, तरीही आम्ही संयम राखला. कोणत्याही परिस्थितीत सोहळा बिघडू नये यासाठी आम्ही प्रयत्न करत राहिलो, असे नागरिकांनी सांगितले. त्यांनी हा प्रकार पूर्वनियोजित असल्याचा गंभीर आरोपही केला आहे तसेच पनवेल कोळीवाड्याने शेवटपर्यंत संयम राखून परिस्थिती हाताळली, मात्र आमची बदनामी करण्याचा डाव समोरच्या बाजूकडून रचला जात आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या प्रकरणी सत्य समोर यावे आणि पनवेल कोळीवाड्याची भूमिका जनतेसमोर स्पष्ट व्हावी, यासाठीच आम्ही मीडियासमोर आलो आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने जितेंद्र मुंडकर सन्मानित

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने पनवेल तालुक्यातील चिंचपाडा येथील जितेंद्र मुंडकर यांना सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्यातर्फे २५ आणि २६ मार्च रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सध्याची तरुण पिढी व्यसनांच्या आहारी गेली आहे. मात्र अनेक ठिकाणी दारूबंदी कागदावरच राहत आहे. चिंचपाडा येथील जितेंद्र मुंडकर यांनी व्यसन या चित्रपटाद्वारे गावागावात जाऊन स्वतःची गाडी घेऊन व्यसन या चित्रपटाच्या माध्यमातून नागरिकांचे, तरुणांचे प्रबोधन केले तसेच व्यसनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. गेली अनेक वर्ष मुंडकर यांनी हे काम केले. व्यसनामुळे अनेकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आता जरी व्यसन सोडा असा मोलाचा सल्ला त्यांनी तरुणांना दिला. या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

## संपादकीय

# बदलांची नांदी

‘जेन झी’च्या आंदोलनामुळे नेपाळमध्ये झालेल्या राजकीय सत्तापालटातून पंतप्रधानपदी आलेल्या बालेन शाह यांनी पदापर्णातच मोठे बदल केले असून त्यांनी सुरुवात शिक्षण क्षेत्रापासून केल्याचे दिसते. नेपाळमध्ये आता शिक्षण सुलभ करण्याकरिता पाचवीपर्यंतच्या सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी राजकारणावर बंदी घालण्यात आली आहे. तरुणांच्या आंदोलनाचे नेतृत्व करीत राष्ट्रीय राजकारणात उतरलेल्या बालेन शाह यांनी प्रारंभीच उचललेल्या या पावलातील विरोधाभास लपून राहात नाही.

**साधारणपणे पाच ते सहा महिन्यांपूर्वी नेपाळमध्ये ‘जेन-झी’च्या आंदोलनाचा उद्रेक पहायला मिळाला होता. तरुणांच्या या आंदोलनातून तेथे राजकीय सत्तांतर घडून आले. आंदोलनाच्या काळात तरुणांमधील लोकप्रिय नेतृत्व असलेले ३५ वर्षांचे बालेंद्र शाह यांच्याकडेच आता देशाचे नेतृत्व आले असून त्यांनी आपल्या छोट्याशा देशात मोठे बदल करायला घेतले आहेत. बालेन शाह सरकारने पहिल्याच कॅबिनेट बैठकीत शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी नवा १०० कलमी सुधारणा आराखडा जाहीर केला असून त्यानुसार शाळा-कॉलेजांतील राजकीय हस्तक्षेप पूर्णपणे संपुष्टात येणार आहे. शैक्षणिक संस्थांमधील राजकीय विद्यार्थी संघटनांवर बालेन शाह सरकारने बंदी घातली आहे. अवघ्या काही महिन्यांपूर्वी नेपाळमधील तरुणांच्या संयमाचा बांध फुटलेला जगाने पाहिला होता. तत्कालीन सरकारने समाजमाध्यमांवर बंदी घालताच तरुणांचा संताप अनावर झाला. आर्थिक दुरावस्था व बेरोजगारीने वैफल्यग्रस्त झालेल्या नेपाळी तरुणांनी देशातील राजकीय नेत्यांना आंदोलनादरम्यान रस्त्यावर बडवले. अखेरीस तत्कालीन पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतरच हे आंदोलन शांत झाले. त्यावेळी रॅपर बालेन शाह यांनी संगीताच्या माध्यमातून नेपाळी तरुणांच्या भावनांना वाट मोकळी करून दिली होती. अलीकडेच नेपाळमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बालेंद्र (बालेन) शाह यांना तेथील जनतेने भरभरून कौल देऊन पंतप्रधानपदी बसवले. तरुणाईच्या अस्वस्थतेची ताकद जवळून पाहिलेल्या बालेन शाह यांनी पदावर येताच महाविद्यालयांतील राजकीय संघटनांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. त्याऐवजी तिथे स्टुडंट कौन्सिलची स्थापना करण्यात येणार असून विद्यार्थी तिथे आपले प्रश्न मांडू शकतील. शाह यांच्या सरकारने आता देशाच्या फेरउभारणीसाठी शंभर कलमी आराखडा आखला असून नव्या सुशासनपर्वाची घोषणा केली आहे. लहान मुलांवरील अभ्यासाचा आणि परीक्षांच्या निकालाचा दबाव कमी करण्यासाठी पाचवीपर्यंतच्या पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या परीक्षाही रद्द करण्यात आल्या आहेत. मुलांची समजून घेण्याची क्षमता, त्यांची वर्तणूक आणि मानसिक विकासाच्या आधारे त्यांची प्रगती मोजली जाईल. हे सारे बदल कागदोपत्री चांगले दिसत असले तरी त्यांची अंमलबजावणी निगुतीने करावी लागेल. अन्यथा शालेय शिक्षणाचा बोजवारा उडू शकतो. दुसरीकडे नेपाळी संस्कृती जपण्याची हाकाटी करून बालेन शाह यांनी आपण वेगाने राजकारण आत्मसात करत असल्याची चुणूकही दाखवली आहे. नेपाळमध्ये ज्या शाळांची नावे ऑक्सफर्ड किंवा सेंट झेवियर्स यांसारखी विदेशी आहेत, त्यांना वर्षाच्या अखेरपर्यंत आपली नावे बदलावी लागणार आहेत. देशाची संस्कृती जपण्यासाठी ही नावे नेपाळी भाषेत असावीत असे निर्देश बालेन शाह सरकारने दिले आहेत. स्वाभाविकच सध्या नेपाळी जनता बालेन शाह यांच्या या निर्णयांचे स्वागतच करते आहे. पण याच जनतेच्या याहून कितीतरी अधिक आव्हानात्मक अशा अपेक्षा बालेन शाह यांना पूर्ण कराव्या लागतील. तरच नेपाळी जनतेचे हे प्रेम टिकून राहील.**

# अहिंसेला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या भगवान महावीरांची वाणी

जगा व जगू द्या हा संदेश देणाऱ्या, परस्परांवर प्रेम करा, कोणाशीही शत्रूत्व करु नका, प्रेम हेच अहिंसचे मंगल रूप आहे. अहिंसा हाच आपला धर्म आहे तसेच प्रेमाचा, शांतीचा, समतेचा संदेश देणाऱ्या पाच महाव्रतांच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या भगवान महावीरांची आज जयंती...

जैनांचे समस्त दर्शन व जीवन अहिंसेवर आधारित आहे. जैन संस्कृतीची जगाला सर्वात मोठी देणगी जर कोणती असेल तर ती अहिंसा. भगवान महावीर हे अहिंसेचे अग्रगण्य संदेशवाहक. प्राणिमात्रांना सुख, सोयी व आराम देणे ही त्यांची आज्ञा. ते म्हणतात, ‘सर्व प्राण्यांना आपला जीव प्यारा असतो. सुख सर्वांना चांगले वाटते व दुःख वाईट. सर्वांना जीवन प्रिय असते. कुणाची हिंसा करु नका! कुणास त्रास देऊ नका. सर्व जीवांबल मित्रत्वभाव कायम ठेवा.’ भगवान महावीरांनी हिंसेला सर्व पापांचे मूळ मानले असून अहिंसेला परमधर्म मानले.

जैनाचार्य म्हणतात, ‘दुसऱ्याला आनंदाने जगण्यास सहाय्य करा, त्याच्या प्रसन्नतेची वृद्धी करा, त्याच्या आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नतीसाठी प्रयत्न करा, त्याच्या प्राणरक्षणार्थ स्वतःच्या सुखाचे, प्राणाचे बलिदान करा.’

महात्मा गांधीजींना अहिंसात्मक लढ्याची स्फूर्ती व लोकसेवेची प्रेरणा जैनांकडून मिळाली. भगवान महावीर प्रणीत अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या तत्वानुसार महात्मा गांधीजी जीवनाचा प्रत्येक क्षण जगले.

भगवान महावीर म्हणतात, प्रत्येक पुरुषाने सत्यास सम्यकपणे समजून घ्यावे. सत्याची आराधना करणारा मनुष्य मृत्यूवर मात करुन जातो. सत्य हेच विश्वात सारभूत आहे.

भगवान महावीर म्हणतात ....

‘तं सच्चं खु भगवंतं’

सत्य परमात्मा आहे. सत्य राम आहे. सत्य नारायण आहे. सत्य वासुदेव आहे. सत्य हरी आहे. सत्य म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर होय. सत्यवादी मनुष्य आईप्रमाणे विश्वसनीय, जनतेसाठी गुरुप्रमाणे प्रिय तसेच स्वजन व सर्वांसाठी प्रिय असतो.


विश्वसनीय मातेव,<br>
भवति पूज्यो गुरुरिव लोकस्य<br>
स्वजन इव सत्यवादी,<br>
पुरुषः सर्वस्य भवति प्रियः॥

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. दुसऱ्याच्या संपत्तीचा लोभ न बाळगणे. भगवान महावीर म्हणतात, परधनाची इच्छा, मोह, तृष्णा, गुप्ती, असंयम, कांक्षा, हस्तलाघव, परवित्त हरण, कूट-तोलमाप आणि न दिलेली वस्तू घेणे ही सारी कृत्ये चोरीची होत. परधनाची इच्छा बाळगणारे निर्दय असतात, लोभी असतात. त्यांची आसक्ति सतत वाढत असते. सुख, समाधान, संतोष यांच्या अभावामुळे, लोभ वाढल्यामुळे तो दुसऱ्यांच्या अमूल्य वस्तुंची चोरी करतो.

‘गरजा कमी करा` महात्मा गांधीजींचे हे सूत्र लाखमोलाचे आहे. अस्तेय व्रताचे पालन करणारा उत्तरोत्तर आपल्या गरजा कमी करत जातो. आचार्य सुनील सागर महाराज म्हणतात, ‘गरजा कमी करा` यातूनच निर्लोभी, शुचितापूर्ण जीवन जगू शकू. संत कबीरदास म्हणतात, ‘माझ्या सर्व गरजा ईश्वरच पूर्ण करतो. ईश्वराच्या सामर्थ्यांवर माझा पूर्ण विश्वास आहे.`

‘अपरिग्रह` या व्रताविषयी भगवान महावीर म्हणतात.... ‘मुच्छा परिग्गहो वृत्तो’ वस्तुबल ममत्वभाव म्हणजे परिग्रह होय. मुनीश्री अक्षय सागर महाराज म्हणतात, ‘आत्म्यास सर्वांगाने जखडून टाकणे. अथवा पर पदार्थात ममत्वभव होणे, ह्यास परिग्रह म्हणतात.’

पशुपक्षी व नोकरचाकर इत्यादि सजीव वस्तू आणि घरदार, शेतीवाडी, धनधान्य इत्यादि अजीव वस्तू यांच्याबल ममत्व बुध्दी राखणे म्हणजे परिग्रह होय. अनावश्यक वस्तूंचा संग्रह न करणे म्हणजेच अपरिग्रह व्रताचे पालन करणे होय. भगवान महावीर म्हणतात, ‘रुप, शब्द, गंध, रस, स्पर्श आणि भाव यांच्या परिग्रहात आसक्ति असू नये. श्रावकाने तेल, तूप, लोणी, मीठ, गुळ या वस्तूंचा साठा करु नये.’



धन-धान्य इत्यादिंचा परिग्रह नरकाचे मूळ आहे. परिग्रहामुळे आर्थिक विषमता, वैर-विरोध, संघर्ष उत्पन्न होतो, कपटीपणा, अनाचार जन्माला येतो. संग्रही वृत्तीतून वस्तूंचा तुटवडा तो. गरजू, गरीब व्यक्तिंना त्या वस्तू पासून वंचित राहावे लागते. अपरिग्रह कसोशीनं आचरणात आणले तर अहिंसेचे आपोआप पालन होते.

भगवान महावीर ब्रह्मचर्यास परमात्मा मानतात. मुनी नथमलजी यांनी महावीर वाणीच्या आधारे ब्रह्मचारी व्यक्तिच्या दिनचर्येचे अत्यंत सूक्ष्म विवेचन-विश्लेषण केले आहे. एकांतवास, कथा-संयम, परिचय-संयम, दृष्टि-संयम, श्रुती-संयम, थंडी व उष्णता सहन करणे, सौकुमार्यं-त्याग, राग-द्वेष त्यागाचा संकल्प करणे, गुरुचे मार्गदर्शन, अज्ञानी मनुष्याची संगती न करणे, स्वाध्याय व ध्यानामध्ये लिन असणे, सूत्रार्थाचे चिंतन करणे, निर्दोष आहार, मादक वस्तु वर्जित आहार, कुशल सहकार्याबरोबर संपर्क, सतत दक्ष, जागरुक, सावध व सतर्क राहणे, भविष्य-दर्शन, कामभोगाच्या नश्वरतेचे चिंतन, ग्रामानुग्राम-विहार अर्थात एकाच ठिकाणी वास्तव्य न करणे, श्रृंगार, साज-सज्जा न करणे, विकारपूर्ण सामग्रीचे अदर्शन, अप्रार्थन, अचिंतन, अकीर्तन, इंद्रियांचा बहिर्मुखी व्यापार न करणे, इत्यादी विषयांचे विवेचन केले आहे.

स्त्रीसोबत कामक्रीडेची तीव्र अभिलाषा, पौष्टिक, स्वादिष्ट, स्निग्ध, रसयुक्त भोजन, स्त्रीच्या अंगोपांगाचे निरीक्षण करणे, पूर्वकालिन कामक्रीडेचे, कामरसानुभूतीचे स्मरण, कामोत्तेजक रस व औषधांचे सेवन, कामसाहित्य वाचन, भविष्यातसुध्दा कामक्रीडेची तीव्र इच्छा बाळगणे, या अब्रह्म प्रकारांचा उल्लेख भगवान महावीरांनी केला आहे.

महात्मा गांधीजी म्हणतात, ‘ब्रह्मचर्य-पालन परमेश्वरास शोधण्याचा एक मार्ग आहे. हा जीव परमेश्वराचा अंश आहे आणि परमात्मा आपल्यात वास करतो हा अनुभव येणे हा ब्रह्मचर्य पालनाचा रामबाण उपाय आहे.’

भगवान महावीर पाच महाव्रतांना आचरण म्हणतात, मनुष्याने उद्यमी, संयमी व अहंकार रहित असावे. सर्व जीवांबल मैत्रीभाव असावा. दुर्जन व अज्ञानी यांची संगती करु नये. स्वादिष्ट आहार करु नये. उभे राहणे, हात जोडणे, आसन देणे, गुरुजनांची भक्ती आणि त्यांची सेवा यांना ते विनय म्हणतात. मनुष्याने नम्र असावे. त्याने कुणाचाही तिरस्कार करु नये. अप्रिय मित्राचा सुध्दा तिरस्कार करु नये, निंदा करु नये, त्याची स्तुती करावी. आजारी मनुष्याची सेवा करण्यास जागरुक व दक्ष असावे. परमश्रेष्ठींना तसेच आचार्यांना नमस्कार करावा. ज्ञानसंपन्न शिष्यानेसुध्दा गुरुची विनयपूर्वक सेवा करावी. मन, वचन, कायेने कुणाचाही विरोध करु नये. कुणालाही तुच्छ मानू नये, त्याची उपेक्षा करु नये. दान करण्याच्या वृत्तीस श्रेष्ठ आचरण मानतात. मादक द्रव्यापासून अलिप्त राहावे, मांसाहारापासून अलिप्त असावे, कीड असलेली फळे व मध खाऊ नये. रात्री भोजन करु नये. पिण्याचे पाणी स्वच्छ गाळलेले असावे. जुगार खेळू नये, शिकार करु नये, व्यभिचार करु नये, रोज काहीतरी धार्मिक कृत्य करावे, कोणालाही दुखापत करणारे कर्म करु नये, दिवसातून तीनदा ईश्वर प्रार्थना करावी महिन्यातल्या ठरलेल्या दिवशी उपवास करावा.

जैन धर्मातील लोकांना जे सामाजिक नियम व कर्तव्ये सांगितली आहेत ती अशा प्रकारची आहेत की त्यामुळे समाजाचे कल्याण होऊन उन्नती व्हावी व त्याबरोबर प्रत्येक व्यक्तीला स्वतःची उन्नती करुन घेण्याचा मार्ग मोकळा असावा.

नीतिशास्त्र यामध्ये दोन शब्द आहेत. एक नीति आणि दुसरा शास्त्र. ‘शास्त्र` शब्द ‘शास्` धातू पासून बनलेला आहे. याचा अर्थ आहे- शिकणे, सांगणे, नियंत्रण ठेवणे, सल्ला देणे, दंड देणे इत्यादी. कर्तव्य, अधिकार, सद्गुण, उत्तरदायित्व हे ही शब्द वरील अर्थाचे द्योतक आहेत.

जैनाचार्य म्हणतात, पक्षपात करु नये. यामुळे घरात प्रेम, विश्वास, न्याय, सम्मान टिकून राहतो. परिचित-अपरिचित व्यक्तींनी केलेले उपकार विसरु नयेत. कुऱ्हाड, तलवार, कुदळ-फावडा, अग्नि, शस्त्र, विष, साखळदंड इत्यादी हिंसेची साधने स्वतः जवळ बाळगू नयेत अथवा दान देऊ नयेत. आचार्य श्री चन्द्रशेखर विजयजी म.साहेब म्हणतात, सुव्रतींनी, श्रावक-श्राविका यांनी, ज्ञानप्राप्ती करत असताना काना-मात्रा याकडे लक्ष द्यावे. वर्तमानपत्रावर बसू नये. अक्षरांनी युक्त के, बूट, मौजे वापरु नयेत. वर्षातून एकदा शाळेतील मुलांना पुस्तके, वहा, पेन इत्यादी साधने द्यावीत. आचार्य तुलसी एक श्रेष्ठ मुनी आहेत. ते म्हणतात, विद्यार्थ्यांनी आज्ञापालन करावे. परीक्षेच्या वेळ अवैद्य मार्ग चोखाळणे गैर आहे. आचार्य प्रवर श्री आनंद ऋषिजी महाराज म्हणतात, सुव्रतींनी सात्त्विक भोजन करावे तसेच समयानुकूल आहार घ्यावा. आपणास मिळालेल्या नीरस, रुक्ष पदार्थांची निंदा करु नये. आहार गरजेपूरता असावा. गृहस्थांनी खिडकीतून थुंकू नये. सुव्रतींनी स्वावलंबी असावे. स्वतःला चिंतेपासून अधिकाधिक मुक्त करावे. भजन, भोजन आणि भाषण घाई-गडबडीत करु नये.

भगवान महावीर व त्यानंतरच्या जैनाचार्यांनी सांगितलेले सामाजिक व नैतिक नियम श्रावक-श्राविका, सुव्रती व सद्गृहस्थ यांच्या करिता अत्यंत उपयुक्त आहेत. यांच्या पालनाने सर्वांचे चारित्र्य उज्ज्वल होते. भगवान महावीरांनी सांगितलेल्या व्रतांचे श्रध्दापूर्वक पालन करणे म्हणजेच भक्ती होय.

**-डॉ. विजयकुमार रणदिवे, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

### आता आयफोनमध्ये एकाच वेळी व्हॉट्सॲपचे दोन अकाउंट्स

व्हॉट्सॲपकडून अनेक नवीन फीचर्सची घोषणा करण्यात आली आहे. या फीचर्सची माहिती 'Wabetainfo' ने शेअर केली आहे. नवीन अपडेटनुसार, युजर्सना चॅट्स मॅनेज



करणं आणि वेगवेगळ्या डिव्हाइसेसवर कंटेंट मॅनेजमेंट करणं आता अधिक सोपं झालं आहे. WhatsAppच्या नवीन अपडेटमध्ये युजर्सना एकूण नवीन फीचर्स पाहायला मिळतील. यामध्ये स्टोरेज, अकाउंट मॅनेजमेंट, मेसेजिंग टूल्स आणि AI बेस्ड इम्प्रूव्हमेंट समावेश आहे.

व्हॉट्सॲपने नवीन 'स्टोरेज टूल्स' ची घोषणा केली आहे. याद्वारे युजर्स कोणत्याही एका चॅटमधील मोठ्या फाइल्स शोधून त्या डिलीट करू शकतील. यासाठी पूर्ण चॅट डिलीट करण्याची गरज नाही. युजर्सकडे फक्त मीडिया (फोटो-व्हिडीओ) डिलीट करून टेक्स्ट मेसेज सुरक्षित ठेवण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

व्हॉट्सॲपने चॅट हिस्ट्री ट्रान्सफर करणं अधिक सोपं केलं आहे. आता एपलचे iOS आणि गुगलचे अँड्रॉइड या दोन वेगवेगळ्या ऑपरेटिंग सिस्टममध्ये चॅट हिस्ट्री ट्रान्सफर करणं सोपं झालं आहे. युजर्स क्लाउड बॅकअपशिवाय थेट मेसेज, फोटो आणि व्हिडीओ ट्रान्सफर करू शकतील.

ॲपलच्या iPhoneसाठी 'मल्टिपल अकाउंट' सपोर्ट जारी करण्यात आला आहे. आता आयफोन युजर्स एकाच एपमध्ये दोन वेगवेगळे नंबर वापरू शकतील. यासाठी एक अकाउंट लॉगआउट न करता फक्त 'स्विच' करावं लागेल. टॅब बारमध्ये प्रोफाईल फोटो दिसेल, ज्यामुळे कोणते अकाउंट सक्रिय आहे हे समजेल. यामुळे पर्सनल आणि कामाचं अकाउंट वेगळं ठेवणं सोपं होईल.

व्हॉट्सॲपवर मिळणाऱ्या Meta AIच्या मदतीने आता फोटो एडिटिंगही करता येईल. याद्वारे फोटोमधील नको असलेलं ऑब्जेक्ट्स काढणं, बॅकग्राउंड बदलणं आणि विविध स्टाईल्स वापरणं शक्य होईल. सुरुवातीला हे फीचर काही निवडक लोकांसाठी उपलब्ध असेल.

'रायटिंग हेल्प' हे फीचर समोरच्या व्यक्तीनुसार मेसेजचे सल्ले देईल. तसेच युजर्सना अधिक अचूक आणि योग्य उत्तरांचे पर्याय सुचवेल. हे फीचर वापरताना युजर्सच्या प्रायव्हसीची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे.

व्हॉट्सॲपच्या या लेटेस्ट फीचर्सचं रोलआउट सुरू झालं असून येणाऱ्या काही दिवसांत हे फीचर्स जगभरातील सर्व युजर्सपर्यंत पोहचतील.

# हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री मीनाकुमारी



## निमित्त

भारतीय चित्रपटसृष्टीत ’ट्रॅजेडी क्वीन’ म्हणून ओळखल्या गेलेल्या अभिनेत्री मीनाकुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी झाला. मीना कुमारी या नावानं त्यांनी बॉलीवूडमध्ये ओळख मिळाली, मात्र त्यांचं मूळ नाव ’महजबी बानो’ असं होतं. फक्त ३८ वर्ष जगणाऱ्या मीनाकुमारी यांनी चित्रपट सृष्टीत मोठं नाव कमावलं. आज मीनाकुमारी यांचा स्मृतीदिन. त्यानिमित्त जाणुन घेऊया या लेखातून मीनाकुमारी यांच्याविषयी...

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री. त्यांचा जन्म दादर, मुंबई येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अली बक्श आणि आई प्रभावती देवी (लग्नानंतर इकबाल बानो). मीनाकुमारी हे या दांपत्याचे तिसरे अपत्य. त्यांनी त्यांचे नाव महजबी बानो असे ठेवले. अली बक्श पारशी रंगभूमीवर काम करीत. त्यांची कौटुंबिक परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे मीनाकुमारींना शालेय शिक्षण घेता आले नाही आणि चित्रपटात काम करण्यास सुरुवात करावी लागली. मात्र चित्रपटात काम करू लागल्यावर जुजबी लिहिण्यावाचण्याचे शिक्षण त्यांना घरी देण्यात आले. छोट्या महजबीला विजय भट्ट यांच्या लेदरफेस या चित्रपटात पहिल्यांदा बालकलाकार म्हणून काम करण्याची संधी मिळाली (१९३९). पुढे भट्ट यांच्याच एक ही भूल या चित्रपटातही काम मिळाले (१९४०). त्यावेळी त्यांनीच महजबीचे नामकरण बेबी मीना असे केले. १९४६च्या बच्चों का खेल या चित्रपटातून त्यांना मीनाकुमारी म्हणून ओळख मिळाली. त्यावेळी त्या तेरा वर्षांच्या होत्या. या चित्रपटामुळे त्या रातोरात प्रसिद्धीच्या झोतात आल्या. त्यानंतर मीनाकुमारींना अनेक चित्रपट मिळाले. सुरुवातीच्या काळात त्यांनी हनुमान पाताल विजय, श्री गणेश महिमा, वीर घटोत्कच अशा पौराणिक चित्रपटांतून कामे केली.

१९५२च्या बैजू बावरा चित्रपटाने मीनाकुमारींचा चित्रपट प्रवास बहरला. यातील ‘गौरी’ या भूमिकेमुळे त्या घराघरांत पोहोचल्या. हा चित्रपट तब्बल शंभर आठवडे चालला. याच चित्रपटासाठी १९५४मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळविणाऱ्या त्या पहिल्या अभिनेत्री आहेत. दायरा, दो बीघा जमीन, परिणीता हे १९५३ साली प्रदर्शित झालेले मीनाकुमारींचे चित्रपट आहेत. सामान्य महिलांचा रोजच्या जगण्यातील संघर्ष त्यांनी परिणीतामधून लीलया साकारला. त्यांची खास अभिनयशैली आणि साजेसा आवाज यामुळे भूमिकेचे सोने होत होते. या चित्रपटाकरिता सलग दुसऱ्यांदा मीनाकुमारींना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले.मीनाकुमारी यांना काजल या चित्रपटाकरिता १९६५मध्ये सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून फिल्मफेअर पुरस्काराने गौरविण्यात आले. बंगाल फिल्म जर्नलिस्ट असोसिएशनने शारदा या चित्रपटाशिवाय १९६३ साली आरती, १९६५ साली दिल एक मंदिर याही चित्रपटांकरिता सर्वश्रेष्ठ अभिनेत्री म्हणून त्यांना गौरविले.

सत्तरीच्या दशकात मीनाकुमारींची प्रकृती अधिकच खालावली. त्यांना मुंबईच्या सेंट एलिझाबेथ हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. त्यापूर्वी त्यांनी आपल्या बहुतांश चित्रपटांचे अर्धवट राहिलेले चित्रीकरण पूर्ण केले होते. अपवाद फक्त दुश्मन या चित्रपटाचा होता. आजारपणात त्यांनी तो चित्रपट पूर्ण केला. हाच त्यांच्या कारकिर्दीतील शेवटचा चित्रपट ठरला. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### इयरफोन्स कायम कानात असतात? घ्या ही काळजी

आजकाल मोबाइल, ऑनलाइन काम, गाणी किंवा व्हिडिओ पाहताना हेडफोन्स किंवा इयरफोन्स वापरण्याची सवय अनेकांना लागली आहे. ही सवय सोयीची असली तरी योग्य काळजी घेतली नाही तर ती कानांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे इयरफोन वापरताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आवाजाची पातळी.



अनेक जण मोठ्या आवाजात गाणी ऐकतात, पण सतत जास्त आवाजात ऐकल्यास कानातील नाजूक पेशींवर ताण येतो. यामुळे हळूहळू ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे नेहमी मध्यम आवाजातच इयरफोन वापरावा. तज्ज्ञांच्या मते, ६० - ६० नियम पाळणे योग्य ठरते, म्हणजे ६० टक्के आवाजावर आणि सलग ६० मिनिटांपेक्षा जास्त वापर टाळावा.

इयरफोनची स्वच्छता ही दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. इयरफोन्स सतत कानात घातल्याने त्यावर मळ, घाम आणि बॅक्टेरिया जमा होतात. हेच इयरफोन पुन्हा वापरल्यास कानात संसर्ग होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे आठवड्यातून किमान एकदा इयरफोन स्वच्छ करणे आवश्यक आहे. सॉफ्ट कापड वापरुन बाहेरील भाग हलक्या हाताने पुसावा. इयरबड्सचे सिलिकॉन कव्हर काढून वेगळे धुवावे आणि पूर्ण कोरडे झाल्यावरच पुन्हा वापरावे. दीर्घकाळ सतत इयरफोन वापरणेही टाळावे. बराच वेळ कान बंद राहिल्यामुळे हवा खेळती राहत नाही आणि त्यामुळे घाम व ओलावा वाढतो. यामुळे इन्फेक्शनचा धोका वाढतो. म्हणूनच काही वेळाने इयरफोन काढून कानांना विश्रांती देणे गरजेचे आहे. विशेषतः झोपताना इयरफोन लावण्याची सवय टाळावी, कारण यामुळे कानांवर दाब येतो आणि नुकसान होऊ शकते.

इयरफोन इतरांबरोबर शेअर करणे टाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कानातील बॅक्टेरिया वेगवेगळे असतात. इयरफोन शेअर केल्यास हे जंतू एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे जाऊ शकतात आणि संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे शक्यतो आपले इयरफोन स्वतःपुरतेच वापरावेत. कानांची स्वच्छता करताना देखील काळजी घेणे आवश्यक आहे. काडी किंवा टोकदार वस्तू वापरून कान साफ करणे टाळावे, कारण यामुळे कानाच्या आतल्या भागाला इजा होऊ शकते. जर कानात खाज, वेदना किंवा आवाज येण्यास त्रास होत असेल, तर स्वतः उपाय करण्यापेक्षा डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

# गॅसटंचाईचा फटका : महाडमधील हॉटेल-केटरर्स अडचणीत



**महाड : प्रतिनिधी**

ईराण, ईस्त्राइल व अमेरिका युद्धामुळे आखाती देशात निर्माण झालेल्या तणावाने देशपातळीवर व्यावसायिक गॅस टंचाईचा तीव्र फटका बसत असून, त्याचा परिणाम महाड तालुक्यातील हॉटेल व्यवसायिक व केटरर्सवरही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. गॅसअभावी अनेक ठिकाणी हॉटेल्स तसेच केटरिंग व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ ओढवली आहे. व्यवसायिक अक्षरशः अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर महाडमधील हॉटेल व्यवसायिक व केटरर्स संघटनेच्या वतीने सोमवारी उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रांताधिकारी पोपट ओमासे यांची भेट घेऊन तातडीच्या उपाययोजनांची मागणी करण्यात आली.

संघटनेच्या प्रतिनिधींनी यावेळी स्पष्ट केले की, गॅस एजन्सींनी किमान मर्यादित प्रमाणात तरी सिलेंडर उपलब्ध करून दिले, तरच व्यवसाय सुरू ठेवणे शक्य होईल; अन्यथा हॉटेल बंद ठेवण्याची वेळ ओढवेल. काही भागात अंशतः पुरवठा होत असल्याचे उदाहरण देत, महाडमध्येही या पद्धतीनेव्यवस्था राबवावी, अशी ठोस मागणी करण्यात आली.

या समस्येमुळे केटरर्स व्यावसायिकांची स्थिती अधिकच गंभीर बनली आहे. लग्नसमारंभ व विविध कार्यक्रमांसाठी महिन्यांपूर्वीच ऑर्डर्स स्वीकारून आगाऊ रक्कम घेतलेली असताना, गॅसअभावी सेवा देणे अशक्य होत आहे. चुलीवर स्वयंपाक हा पर्याय असला तरी अनेक ठिकाणी सभागृह व्यवस्थापनाकडून त्यास परवानगी मिळत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली.दरम्यान, पर्याय म्हणून काही जण डिझेल भट्ट्यांचा वापर करीत असले तरी पेट्रोल पंपांवर कॅन किंवा ड्रममध्ये इंधन देण्यावरील निर्बंधांमुळे डिझेलचीही टंचाई भासत आहे. परिणामी, सर्वच पर्याय बंद पडत असून व्यवसाय ठप्प होण्याची भीती व्यक्त होत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने पुढाकार घेऊन किमान मर्यादित गॅस पुरवठा सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती संघटनेने प्रांताधिकाऱ्यांकडे केली. यावर प्रांताधिकारी ओमासे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली ही टंचाई जागतिक स्वरूपाची असून देशभर त्याचे पडसाद उमटत आहेत. सध्या उपलब्ध असलेला गॅस प्राधान्याने रुग्णालये, विद्यार्थी वसतिगृहे, आश्रमशाळा, निवासी शाळा तसेच पोषण आहार योजनांसाठी वितरित केला जात आहे. पुरवठा सुरळीत होताच व्यवसायिक गॅस उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी संघटनेच्या वतीने प्रांताधिकाऱ्यांना याबाबत एक निवेदन देण्यात आले. या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीच्या हटाळेश्वर चौकात रस्त्याची दैना

## मोठा खड्डा ठरतोय अपघातांना निमंत्रण



**पाली : प्रतिनिधी**

प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली येथील हटाळेश्वर चौकात रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून, मुख्य चौकातच एक भला मोठा खड्डा पडला आहे. यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून भाविक आणि स्थानिकांमध्ये नगरपंचायत कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी या परिसरातून जलवाहिनी नेण्यासाठी खोदकाम करण्यात आले होते. काम पूर्ण झाल्यानंतर खड्डा केवळ मातीचा भराव टाकून बुजवण्यात आला. मात्र, त्यावर डांबरीकरण किंवा ठोस उपाययोजना न केल्यामुळे, अवजड वाहने जाऊन तसेच वाहनांच्या सततच्या वर्दळीने ही माती उखडली गेली आहे. परिणामी, या ठिकाणी आता एक खोल खड्डा तयार झाला असून आजूबाजूला माती आणि खडी पसरली आहे.

हटाळेश्वर चौक हा पालीतील अत्यंत वर्दळीचा भाग आहे. येथून बस, रिक्षा, दुचाकी आणि पायी चालणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी असते. उखडलेल्या मातीमुळे दुचाकी घसरण्याचे शक्यता आहे, तर रात्रीच्या वेळी हा खड्डा न दिसल्यास मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरात पसरलेल्या धुळीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याची झालेली ही दुरवस्था पाहता, नगरपंचायत प्रशासनाने केवळ मातीचा ढिगारा न टाकता, संबंधित खड्डा व्यवस्थित खडीकरण आणि डांबरीकरण करून बुजवावा, अशी मागणी नागरिक करत आहेत. पावसाळ्यापूर्वी हा रस्ता दुरुस्त न झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

# दिवेआगर नगरीत ३१ मार्च ते १ एप्रिलदरम्यान भरणार यात्रा; 'गळी फिरणे' पाहण्यासाठी भाविकांची उत्सुकता

**दिवेआगर : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर नगरीत यात्रेची सुरुवात दिसून येत आहे. दिवेआगर हे सुवर्ण गणेश मंदिर तसेच विस्तीर्ण समुद्रअसा किनारा म्हणून ओळखला जाणार पर्यटन स्थळ आहे.दिवेआगर येथे चैत्र शु.चतुर्दशी व पौर्णिमेला श्री.सिद्धनाथ आणि श्री.केदारनाथ यात्रा भरवली जाते. यात्रेला पंचक्रोशीतून तसेच राज्यभरातुन भाविक दर्शनासाठी येत असतात.



यात्रेचे मुख्य वैशिष्ट म्हणजे गळी फिरणे व हातकोडे हे बघायला भाविक मोठया प्रमाणात गर्दी करत असतात. यात्रेच्या आधी दोन दिवस गावातून श्रीभैरवनाथाची परडी फिरवली जाते. दरवर्षी प्रमाणे गावातील मंडळीकडून मान दिला जातो.

दिवेआगर नगरीत यात्रेच्या पार्श्वभूमीवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात सध्या यात्रेची जोरदार लगबग सुरू असून सर्वत्र तयारीचा धडाका पाहायला मिळत आहे.यात्रेनिमित्त मंडप उभारणी, सजावट, तसेच विविध स्टॉल्सची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. स्थानिक व्यापाऱ्यांनीही यात्रेच्या पार्श्वभूमीवर आपली दुकाने सजवली असून, विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची रेलचेल दिसत आहे.

यात्रेच्या अंतिम टप्प्यात परंपरेनुसार मंदिराच्या आवारात हातकोडे खेळलं जाते. आपली मनोकामना पूर्ण होण्यास भक्तांकडून देवाला साकडं घातलं जाते. नंतर यात्रेचे वैशिष्ट्य म्हणेज गळी फिरणे. या क्षणाची भाविक आतुरतेने वाट पाहत असतात. मंदिराच्या समोर असणाऱ्या चौथरावर मानकऱ्यालापाठीत गळ टुपवण्यात येतो.

विशेष म्हणजे गळ टूपवून घेत असताना रक्ताचं एक थेंबही दिसून येत नाही. हि लाट साधारण 25 ते 30 फुटावर आहे. त्यानंतर मानकऱ्याला लाट फिरवण्यासाठी नेलं जात आणि मानकऱ्याला गळ्याच्या दिशेने पाच फेऱ्या मारल्या जातात.

यात्रेदरम्यान भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी स्थानिक कमिटी, ग्रामपंचायत दिवेआगर, तसेच दिघी सागरी पोलीस सतर्क असून सुरक्षा व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

> **श्री सुवर्ण गणेशाच्या पवित्र भूमीत ३१ मार्च व १ एप्रिलला सिद्धनाथ भैरव व केदारनाथ लिंग यांची यात्रा तिथीप्रमाणे भरवली जात आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी देवस्थान ट्रस्ट तसेच दिघी सागरी पोलीस ठाणे व ग्रामपंचायत दिवेआगर व दिवेआगर ग्रामस्थ यात्रेसाठी इतर सुविधा उपलब्ध करून देत आहेत.**
>
> **–प्रणव हावरे, उपाध्यक्ष, सिद्धनाथ भैरव व केदारनाथ लिंग देवस्थान ट्रस्ट, दिवेआगर**

# तळा कुंभारआळी येथे आज स्वयंभू बापूजी देवाची यात्रा



**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील कुंभार आळी येथे मंगळवार ३१ एप्रिल रोजी श्री स्वयंभू बापूजी मंदिर देवस्थानचा प्रथम वर्धापनदिन व बुधवार १ एप्रिल रोजी बापूजी देव यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवारी पार पडणाऱ्या प्रथम वर्धापनदिन दिनानिमित्त भूपाळया, काकड आरती, उदकशांती, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मूर्तीवर अभिषेक, महाआरती, महाप्रसाद, हरिपाठ, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत तर दरवर्षा प्रमाणे बुधवारी यात्रा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या यात्रेला अंदाजे तीनशे वर्षांचा इतिहास आहे. चैत्र पोर्णिमेला सकाळपासून कुंभार आळी येथे यात्रेला सुरुवात होते.

यावेळी बापूजी देव मंदिराशेजारी विविध प्रकारची दुकाने थाटली जातात. दिवसभर ही यात्रा भरते. या यात्रेनिमित्त दोन देवतांच्या भेटीचा कार्यक्रम पार पडतो. मालाठे गावची द्रोणोबाची काठी कुंभार आळी येथे बापूजी देव मंदिराच्या भेटीसाठी येते. या ठिकाणी दोन्ही काठ्यांची भेट घडवली जाते.

# माणगाव वाहतूक पोलिसांनी वयोवृद्ध महिलेला पोहचविले सुखरूप घरी!

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव वाहतूक पोलिस हे नेहमीच माणुसकीपणा दाखवीत उल्लेखनीय अशी कामगिरी करीत असतात. या वाहतूक पोलिसांनी अशीच एक उल्लेखनीय कामगिरी करीत माणगाव बस स्थानक आवारात असणाऱ्या एका वयोवृद्ध महिलेला तिच्या राहते घरी सुखरूप पोहचविले. वाहतूक पोलिसांच्या या कामगिरीचे विशेष कौतुक होत आहे.



सदर घटनेबाबत अधिक माहिती अशी कि, माणगाव एसटी बस स्थानक आवारात भागाबाई मुकुंद मांगले रा.महागाव ता.तळा हि वयोवृद्ध महिला बराच उशिरा उभी होती.

सदर महिलेकडे माणगाव वाहतूक पोलीस शिवराज बांडे,पोलीस कॉन्स्टेबल बोडके यांनी विचारपूस करून त्यांच्या मुलाशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना गावाला महागावकडे जाण्यासाठी कोणतेही साधन नसल्याने वाहतूक पोलीस बांडे व बोडके यांनी सरकारी वाहन उपलब्ध करून महिलेला तसेच पोलीस पाटील मांगले व त्यांचा मुलगा प्रभाकर मुकुंद मांगले यांना सुखरूपपणे घरी पोहचविले. माणगाव वाहतूक पोलिसांनी हा माणुसकीपणा दाखविल्याने मांगले परिवाराने व महागाव ग्रामस्थांनी वाहतूक पोलिसांचे विशेष ऋण व आभार व्यक्त केले.


### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/cc/auto/2017/246 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-AZ1368 चे मालक **मदन गंगाराम वावा** यांचे तारीख १५/०९/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी मीना मदन वावा, किनारा कौ. हौ. सो. सी१/४ तळमजला ५२ बांगलो जवळ, श्री. सिध्दीविनायक मार्ग, जयनगर सोसायटी, ओल्ड पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – मीना मदन वावा,**
**पत्ता–** किनारा कौ. हौ. सो. सी१/४ तळमजला ५२ बांगलो जवळ श्री. सिध्दीविनायक मार्ग जयनगर सोसायटी ओल्ड पनवेल


# अलिबाग नगर परिषदेच्या श्वान निर्बीजीकरण केंद्राचे लोकार्पण

**अलिबाग :** येथील नगरपरिषदेने सुरू केलेल्या श्वान निर्बीजीकरण केंद्राचे लोकार्पण सोमवारी (दि. ३०) नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. शववाहिनी तसेच मैला उपसा वाहनाचेदेखील यावेळी लोकार्पण करण्यात आले.

आरोग्य सभापती ॲड. मानसी संतोष म्हात्रे, मुख्याधिकारी सागर साळुंखे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, नगरसेवक प्रदीप नाईक, नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, ॲड. संदीप पालकर, अनंत पाटील. सागर भगत, संतोष गुरव, जमालुद्दीन सय्यद, नगरसेविका शैला भगत, ॲड.निवेदिता वाघमारे, ॲड. नीलम हजारे, ॲड. अश्विनी ठोसर, योजना पाटील, वृषाली भगत, सुषमा पाटील, श्वेता पालकर, इंजिनीयर संतोष मुंडे, स्वच्छता अभियंता प्रियंका मोरे, स्वच्छता निरीक्षक धनंजय आंब्रे, आर्या जाधव, मुकादम प्रकाश तांबे, सुमित गायकवाड, नगर रचनाकार सौरभ खरात , पेट फोर्सचे साळवी यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.


### पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका | ०२ कदंब झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अं.भु ३०५ ते तक्का अंडरपास ते नॅश्नल पॅराडाईज बिल्डींग येथे ०२ झाडे पावसाळी गटार बांधणे कामात बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. ८७/९७/२०२६**
**दिनांक :- ३०/०३/२०२६**

**सही/-**
**उपायुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**



### ग्रामपंचायत पळस्पे

ता. पनवेल, जि. रायगड

**जाहिरात**

सन २०२५/२६

ग्रामपंचायत पळस्पे ता. पनवेल, जि. रायगड हे पळस्पे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामांच्या अंमलबजावणी करीता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | १ % इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी (ना परतावा) | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५% अनुदानातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे समाज मंदिर बांधणे. | ९४९५२८/- प्र.आदेश ०९/०३/२०२६ आदेश क्र. ५४४ | ९४९५/- | ५००/- | ०९/०४/२०२६ वेळ सकाळी १० ते १२ पर्यंत | ६ महिने |

१) निविदा मिळणेकरीता दि. ३१/०३/२०२६ ते ०४/०४/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत लेखीअर्ज सादर करणे
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दिनांक ०५/०४/२०२६ ते ०८/०३/२०२६ (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्विकारणेत येतील. दिनांक ०९/०४/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता समक्ष उघडण्यात येईल.
४) ईसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्विकारणेत येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रामपंचायत पळस्पे यांचे नावी असावा, अथवा चेकने / रोखीन.
५) ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
६) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
७) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्विकारली जाणार नाही.
८) निविदा फॉर्म किंमत नापरतावा राहील.
९) नियमाप्रमाणे आयकर व १८% GST भरावी लागेल.
**१०) अधिकृत / नोंदणीकृत ठेकेदार यांची निविदा स्विकारण्यात येईल / ग्राहय धरली जाईल.**
११) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% GST, २% आयकर, १% लेबर इन्सुरन्स, १% उपकर या रक्कमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१२) वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीने काम करुन घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशिर कारवाईस जबाबदार रहावे लागेल
१३) झालेल्या तांत्रीक मुल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. (अंदाजपत्रकीय रक्कमेपक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कमच देय असेल
१४) वर्क ऑर्डर दिल्यानंतर १५ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१५) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रीक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१६) निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करुन घ्यावा लागेल
१७) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल
१८) काम पुर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाही.
१९) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
२०) निविदा धारकाकडे पॅन असणे आवश्यक आहे.
२१) ज्याची निविदा मंजूर होईल ती व्यक्ती निविदा उघडण्याच्यावेळी हजर नसल्यास सदर निविदा नामंजूर करणेत येईल याची नोंद घेणे
२२) बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे आवश्यक आहे.
२३) मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरुन वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
२४) ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत लेखापरिक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबंधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२५) एक किंवा सर्व निविदा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२६) आकस्मिक एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फि परत मिळणार नाही.
२७) वर्क ऑडर घेतल्यानंतर काम रद्द केल्यास (योग्य तांत्रीक कारण नसल्यास) संबंधीतास २ वर्षाकरीता ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात येईल
**२८) ठेकेदारी निवड प्राधान्यक्रम नोंदणीकृत असून कमीत कमी दर कमीत कमी दर याप्रमाणे असेल**

दिनांक :- **31/03/2026**

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पळस्पे**

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत पळस्पे**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे मोहो, ता. पनवेल, जि. रायगड येथील **महादेव भगवान म्हात्रे व इतर २** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
शेतजमिन मिळकतीचे वर्णन
मौजे मोहो, तालुका.पनवेल, जि.रायगड.

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| महादेव भगवान म्हात्रे मंदा अरूण पडके हर्षदा हरीभाऊ गायकर | ११६ | २/ब | ०-०९-५० पो.ख.०-०१-०० एकुण ०-१०-५० | २.२१ |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :-
30/03/2026

**सही/-**
**ॲड. विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट & लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat४३@gmail.com

# गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्याधारित ज्ञान काळाची गरज -डॉ. निमसे

## सीकेटी कॉलेजमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदात्त स्वायत्त) येथे पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडी वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन सोमवारी (दि.३०) करण्यात आले होते.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून लखनऊ विद्यापीठ आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे माजी कुलगुरू डॉ. एस.बी. निमसे यांची उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, अॅड. राहुल घरत, प्राचार्य डॉ.एस.के. पाटील आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांचे प्रमुख तसेच विविध विभागांचे प्रमुख मंचावर उपस्थित होते. या सोहळ्यामध्ये पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना तसेच पीएचडीप्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एस.बी. निमसे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, भारताला विश्वगुरू बनण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आणि कौशल्याधारित ज्ञानाची आवश्यकता आहे. भविष्याचा विचार करता कसदार आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्यासाठी आणि परदेशातून भारताकडे शिक्षणासाठी अधिकाधिक विद्यार्थी आकर्षित होण्यासाठी आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर बौद्धिक कुतूहल, महत्त्वाकांक्षा आणि आपण निवडलेल्या क्षेत्राबद्दल सार्थ अभिमान हे तीन गुण आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी असणे अत्यंत आवश्यक आहे. आयुष्यात यशस्वी झाल्यानंतरदेखील आपल्या महाविद्यालयाप्रती सर्व विद्यार्थ्यांनी कृतज्ञ राहावे. डॉ. निमसे यांनी महाविद्यालयातील एकूण विद्यार्थ्यांपैकी सर्वाधिक प्रमाण मुलींचे असल्याबद्दल कौतुक केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, इच्छाशक्ती असेल तर संघर्ष करण्याची ताकद आपल्या पायात आपोआप येते. त्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जागतिक दर्जाचे यश मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्याचबरोबर या महाविद्यालयातून पदवी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. तर प्रमुख पाहुण्यांची ओळख विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक डॉ.एस.एन. परकाळे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. गीतिका तंवर, प्रा.ए.व्ही. पाटील आणि प्रा.एन.एच. कडू यांनी केले, तर उपस्थितांचे आभार परीक्षा नियंत्रक डॉ.एस.आय. उन्हाळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा नियंत्रक डॉ.उन्हाळे, विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे समन्वयक डॉ.परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.डी. आघाव यांनी परिश्रम घेतले. त्यांना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# कासाडी नदी पुन्हा प्रदूषित

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरातून वाहणारी कासाडी नदी पुन्हा एकदा काळ्या गडद रंगाच्या पाण्याने दूषित झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे येथील पर्यावरणीय स्थिती गंभीर बनली आहे. मध्य भागातून पश्चिमेकडे वाहणाऱ्या या नदीच्या पात्रात वारंवार औद्योगिक सांडपाणी सोडले जात असल्याचा आरोप केला जात आहे.

नदीतील पाण्याचा रंग पूर्णपणे काळवंडल्याने या भागात प्राणवायूची पातळी मोठ्या प्रमाणात घटू लागली आहे. या प्रदूषित पाण्यामुळे नदीतील मासे व इतरजलचर जीव जवळपास नाहीसे झाल्याचे दिसून येत आहे. तर, काही ठिकाणी दुर्गंधी मोठ्या प्रमाणात वाढल्याने या भागातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होऊ लागली आहे.याविरोधात येथील नागरिकांनी संबंधित विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही त्यावर ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याने नागरिक आता कमालीचा संताप व्यक्त करू लागले आहेत.

या नदीचे पाणी दिवसेंदिवस अधिक काळवंडत असतानाही संबंधित यंत्रणांकडून केवळ पाहणीचा देखावा उभा करून नदीचे पाणी काळवंडण्यामागचे खरे कारण दडवत असल्याचा आरोप आता येथील नागरिक करू लागले आहेत. तसेच या नदीच्या दूषित पाण्यामुळे भविष्यात या भागात एखादी मोठी दुर्घटना घडलीच तर, त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न येथील नागरिक उपस्थित करू लागले आहेत.


दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी सतीश पडवळ यांनी या घटनेची दखल घेत 'तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल,' असे आश्वासन दिले आहे, मात्र वारंवार घडत असलेल्या या घटनांमुळे कासाडी नदीचे अस्तित्व धोक्यात येत असल्याने येथे तातडीने ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

# गुरुनाथ चिचकरप्रकरणी अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सीबीडी येथे राहणारे गुरुनाथ चिचकर आत्महत्येप्रकरणी घटनेच्या ११ महिन्या नंतर अमली पदार्थ विरोधी पथकाच्या तीन अधिकाऱ्यांच्या विरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुनाथ चिचकर यांचे दोन्ही मुलांची नावे हायड्रा गांजा प्रकरणी आंतरराष्ट्रीय रॅकेट मध्ये आल्याने गुरुनाथ यांची चौकशी सुरु होती. या चौकशी ससेमिऱ्याला कंटाळून त्यांनी २४ एप्रिल २०२५ ला सकाळी राहत्या घरी डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली होती.

नवी मुंबईतील सीबीडी येथे राहणारे गुरुनाथ चिचकर यांचा प्रवास माथाडी कामगार ते राजकीय नेते आणि विकासक असा झाला होता. राजकीय नेत्यात



चांगली उठबैस असणाऱ्या चिचकर यांची धीरज आणि नवीन हे दोन्ही मुले विदेशात राहून हायड्रा गांजाचे रॅकेट चालवत होते. त्यांची स्वतःची टोळी असून त्या द्वारे आशियातील देशात हायड्रा गांजाची तस्करी करून त्यांनी मोठी माया जमवली होती असा आरोपी पोलिसांनी केला होता. या प्रकरणी खात्री झाल्यावर त्यांचे वडील गुरुनाथ चिचकर यांच्या मागे अमली पदार्थ विरोधी पथकाचा ससेमिरा लागला. याला कंटाळून त्यांनी २४ एप्रिल २०२५ ला राहत्या घराच्या तळमजल्यावर एकटे असताना डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली होती.

आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहिली होती. त्यानुसार " सकाळची वेळ आहे मला एनसीबी ने बोलावले आहे आता सहन होत नाही. मी हे कृत्य केले असते तर सहन केले असते अशा आशयाचे लिहले असून आईची माफी मागितली होती तसेच त्रास ज्या अधिकाऱ्यांच्या मुळे झाला त्यांची नावे लिहली होती. त्यामुळे त्यांच्या पत्नीने या अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती, मात्र गुन्हा नोंद करण्यात आला नव्हता. या प्रकरणी त्यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. या प्रकरणी न्यायालयाने गुन्हा नोंद करण्याचा आदेश देताच एनआरआय पोलीस ठाण्यात अमित धावटे , संदीप निगडे, आणि आकाश मलिक या अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचकर यांच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीनुसार दहा पंधरा अधिकाऱ्यांची अचानक घरी येणे कामगारांना दरडावणे , मोबाईल हिसकावून घेणे बँक स्टेटमेंट मागणी करणे, पोलीस ठाण्यात चौकशीच्या नावाखाली दिवसभर बसवून ठेवणे , पैशांची मागणी करणे आदी कारणांना त्रासून पती गुरुनाथ यांनी आत्महत्या केली असून त्यांच्या आत्महत्येस कारण असणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली होती.

हायड्रा गांजा तस्करी प्रकरणी त्यांची दोन्ही मुले नवीन आणि धीरज हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

# गव्हाण विद्यालयाच्या प्रणव राणेला सौ. लक्ष्मीबाई पाटील शिष्यवृत्ती

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर प्रबोधिनी अंतर्गत संस्थेच्या सर्व शाखांमधील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यशवंत आणि किर्तीवंत विद्यार्थी घडविण्यासाठी रयत प्रज्ञाशोध परीक्षा ( आर.टी.एस ) ही इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षेच्या धर्तीवर शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते.



सन २०२६ च्या रयत प्रज्ञाशोध परीक्षे मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी प्रणव प्रशांत राणे हा विद्यार्थी १३२ गुण प्राप्त करून शिष्यवृत्तीधारक होण्यासाठी पात्र ठरला आहे. या विद्यार्थ्यास पुढील आठवी व नववी अशा सलग दोन वर्षात प्रत्येकी दोन हजार याप्रमाणे शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.रयत प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मध्ये विद्यालयातील २९ विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रणव राणे हा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरला आहे.

इतर अकरा विद्यार्थी ही या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये राणे प्रणव प्रशांत ( शिष्यवृत्ती धारक ), इतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये भोईर सात्विक रविंद्र,दुबे अमन आशिष,कनौजिया आदित्य छोटेलाल,मोकल अंश कमलाकर,सूर्यवंशी करण नितिन,ठाकूर स्वराग सचिन,गोदलवाड शिवानी गजानन,कोळी हिमानी राजेंद्र,खरात आरोही राहुल,कोळी जिविका देवनाथ,नाळे आरोही बापू आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

प्रणव राणे ह्या शिष्यवृत्तीधारक होण्यासाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांसह सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयातील सर्व विषय शिक्षक आणि विशेष मार्गदर्शक तसेच या विभागाच्या प्रमुख प्रतिज्ञा घरत आदींचे विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.खास करून विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी ज्युनिअर कॉलेज विभाग स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख,अॅड.राहुल घरत व विजयनाना घरत तसेच विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर,विद्यालय चे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख संजय उगले,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आदींनीही या विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.

# वाशी जुहू चौपाटीची निलेश म्हात्रे यांच्याकडून पाहणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्थानिक प्रश्नांची माहिती घेण्यासाठी व नेहमी विकास कामांसाठी कार्यरत असलेल्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी माजी नगरसेवक तथा भाजप नेते महामंत्री निलेश म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिका वाशी विभागाचे कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चवडे, विभाग अधिकारी सुखदेव येडवे व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत वाशी येथील वाशी जुहू चौपाटी (मिनी सिशोर), होल्डींग पाँड व सागर विहार,. सेक्टर १० ए तसेच सेक्टर ८ येथील सुरु असलेल्या काँक्रीट रोड परिसराचा पाहणी दौरा करण्यात आला. तसेच पाहणी दौऱ्याप्रसंगी माजी नगरसेवक व भाजप नेते महामंत्री निलेश म्हात्रे यांनी सांगितले की, सर्व प्रथम परिसराती केली जाणारी दैनंदिन साफसफाई, मॉर्निंग वॉककरिता येणाऱ्या नागरिकांसाठी पाण्याची व्यवस्था, व्यायामाचे साहित्य, मँग्रोज सफाई व संवर्धन, जेट्टी नूतनीकरणासंदर्भात सविस्तर माहिती घेतली.



तसेच सदर परीसरात जनहितार्थ कोणकोणत्या नागरी सुविधा उपलब्ध करता येतील याकडे ही जातीने लक्ष घातले. तसेच सकाळी मोर्निंग वॉकला येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक व तरुणांसाठी कोणत्या उपाय योजना करता येतील याकडे ही लक्ष घातले. तसेच वाशी जुहू चौपाटी (मिनी सिशोर) सेक्टर १० ए, आणि सागर विहार सेक्टर ८ येथील सुरु असलेल्या कॉंक्रिट रोड तसेच होल्डींग पाँड, आसन व्यवस्था, गजेबो गार्डन, कँटीन, हायमास्ट अशा अनेक उपायोजना व विविध याविषयी वाशी विभागाच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चवडे यांच्या सोबत चर्चा करण्यात आली. तसेच वाशी जुहू चौपाटी सेक्टर १०-ए परीसरामध्ये नियमित परीसर स्वच्छता, मच्छर, डास याकरीता नियमित धुरीकरण, जॉगिंग ट्रॅकच्या पेव्हर ब्लॉकची दुरावस्था, होल्डींग पॉईंट स्वच्छता व निर्जंतुकिकरण या बाबत ही सुचना देण्यात आल्या व इतर सर्व गोष्टी लवकरात लवकर करण्याचे आदेश दिले. तसेच वाशी "सागर विहार व मिनि सिशोर" येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या माध्यमातुन आगरी कोळी बांधवांना मोठ्या प्रमाणात नागरी सुखसोई सुविधा उपलब्ध कशा प्रकारे देता येईल या विषयावर देखील चर्चा करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक व भाजप नेते महामंत्री निलेश म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक राजू शिंदे, भाजपा वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, विक्रम पराजुली, रामकृष्ण अय्यर, निलेश भगत, प्रथमेश पाटील, तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# हॉटेल व्यवसाय बंदचा कांद्यावर परिणाम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एलपीजी गॅसचा तुटवड्यामुळे मुंबई आणि आसपासच्या शहरातील ७० ते ७५ टक्के हॉटेल व्यवसाय बंद असल्याने कांद्याच्या मागणीत मोठी घट झाली आहे. याचा थेट परिणाम मुंबई एपीएमसी कांदा-बटाटा बाजार येथे दिसून येत आहे. उठाव नसल्याने बाजारात कांद्याचे दर घसरले असून मोठ्या प्रमाणात माल साठून पडला आहे. हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारा कांद्याचा वापर थांबला आहे.

परिणामी घाऊक बाजारात आलेल्या मालाला अपेक्षित मागणी मिळत नसून व्यापाऱ्यांचा माल विक्रीविना साठून राहत आहे. किरकोळ बाजारातही मर्यादित खरेदी होत असल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, सध्याच्या घडीला आवक जास्त आणि मागणी कमी असल्याने दरावर दबाव कायम आहे. या परिस्थितीचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत असून उत्पादनाचा योग्य मोबदला मिळत नसल्याने त्यांची आर्थिक अडचण वाढत आहे.

आखाती देशांतील निर्यात बंदीमुळे कांदा एपीएमसीत येत आहे. त्याशिवाय हॉटेल व्यवसायात मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा कांदा उठावाअभावी बाजारातच पडून आहे.

**कांद्याचे दर (प्रति किलो)**

बाजारातील ताज्या स्थितीनुसार, पांढऱ्या कांद्याला १५ ते २० रुपये किलो दर मिळत आहे. महाराष्ट्रातील 'नं. १' कांदा १३ ते १५ रुपये, 'नं. २' कांदा १० ते १२ रुपये दराने विकला जात आहे. याशिवाय गोलटा कांदा ७ ते ९ रुपये, तर गोलटी कांदा ५ ते ७ रुपये किलो दराने विक्री होत आहे. बिनपातीचा सुका कांदा ६ ते ८ रुपये, तर बिनपातीचा ओला कांदा ४ ते ६ रुपये दराने मिळत आहे.



# शीतपेयांचे स्टॉल वाढले; मात्र दर्जाबाबत प्रश्नचिन्ह कायम

**उरण : बातमीदार**

मार्च महिन्यातच तापमान वाढल्याने उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना बाजारपेठेत शीतपेय, लिंबूपाणी, सरबत, ताक, लस्सी आणि फ्रूट सॅलड विकणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिक या पेयांकडे वळत असले तरी त्यांच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

उरण शहरात तसेच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात शीत पेये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.मात्र रस्त्यावर विकले जाणारे बहुतांश शीतपेय स्वच्छतेच्या निकषांवर खरे उतरतातच असे नाही. विशेषतः



लस्सी व ताक तयार करताना वापरले जाणारे दूध, दही आणि पाणी यांची गुणवत्ता तपासली जात नाही. अनेक ठिकाणी बर्फ स्थानिक अनधिकृत कारखान्यांतून आणला जातो, जो स्वच्छ पाण्यापासून तयार झालेला नसण्याची शक्यता असते. त्यामुळे पोटाचे विकार, टायफॉईडसारख्या आजारांचा धोका वाढतो.

ताक आणि लस्सी हे आरोग्यासाठी फायदेशीर पेय मानले जात असले तरी त्यात पाण्याचे प्रमाण जास्त ठेवून विक्री केली जाते. काही ठिकाणी कृत्रिम रंग व स्वाद मिसळून सरबत तयार केले जाते. उन्हाच्या तडाख्यात अनेकजण त्याचे सेवन करतात. फळांच्या नावाखाली विकले जाणारे फ्रूट सॅलडही जुन्या फळांपासून बनवले जाते, असे निरीक्षण आरोग्य विभागाने नोंदवले आहे. उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात शीतपेयांचे सेवन होत असल्याने त्याबाबत खात्री करुनच सेवन करण्याचे आवाहनं प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलचे ॲलर्जी क्लिनिक सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

वाढत्या ॲलर्जीच्या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून न्यूईरा हॉस्पिटलने नवी मुंबईत अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त 'ॲलर्जी क्लिनिक' सुरू केले आहे. या क्लिनिकअंतर्गत रुग्णांसाठी एक विशेष 'ॲलर्जी पॅकेज'तयार करण्यात आले असून,यातंर्गत एकाच पॅनेलमध्ये तब्बल १५० ॲलर्जन्सची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामुळे कमी खर्चात अचूक निदान आणि प्रभावी उपचार व्यवस्थापन शक्य होणार आहे.

ॲलर्जीची लक्षणांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते किंवा त्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार केले जातात ज्यामुळे रुग्णांना दीर्घकाळ त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक अन्न, पर्यावरण आणि जीवनशैलीशी संबंधित विविध प्रकारच्या ॲलर्जींचे अचूक निदान करण्यास मदत करणार आहे.

# उरण तालुका शेतकरी गट समूहाचे प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत उरण तालुका आणि श्रीवर्धन तालुका शेतकरी गट समूहाचे प्रशिक्षण काल २७ मार्च रोजी रोहा येथील श्री विवेकानंद रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिट्यूट येथे संपन्न झाले.

नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत तालुका कृषी उरण आणि प्रकल्प संचालक आत्मा रायगड यांच्या खात्यामार्फत हे शेतकरी गटाचे एक दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत घरच्या घरी शेतीला लागणारी खते आणि औषधे व पेरणी अगोदर



बीज प्रक्रिया कशी करायची याची प्रात्यक्षिके या प्रशिक्षणात दाखविण्यात आली. यावेळी प्रसाद दगडे यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती विषयीचे उत्तम मार्गदर्शन केले. रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. यातून त्यांचे आर्थिक नुकसान होते.

या दुष्परिणामांना थोपविण्यासाठी पारंपारिक नैसर्गिक शेती करणे हा एक उत्तम उपाय आहे. त्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक शेतीसाठी लागणारी खते, औषधे व बियाणांचा वापर योग्य पद्धतीने कसा करायचा, याची प्रात्यक्षिके या प्रशिक्षण शिबिरात दाखविण्यात आली.

# पोलादपूरसाठी पाणीटंचाई निवारण आराखडा

## ८५ गावे, १५९ वाड्यांचा समावेश; उपाययोजनांकरिता १७१ लाखांचा अंदाजित प्रस्ताव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्यात आला असून ८५ गावे आणि १५९ वाड्यांसाठी २४४ उपाययोजनांचा आराखड्यात समावेश करण्यात आला आहे.




याकामी १७१ लाख खर्च अपेक्षित आहे व यामध्ये टँकरने ४४ गावे ८१ वाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी ३७.५० लाख अंदाजित खर्च होणार असल्याची माहिती तहसील कार्यालय आणि पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाच्या दुहेरी यंत्रणेमार्फत देण्यात आली.

तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद गेल्या काही वर्षांपासून होत आहे, मात्र वनराई बंधारे वगळता पाणी अडविण्यासाठी उपयुक्त उपाययोजना न झाल्याने भूजलाची पाणीपातळी खोलवर गेल्याने एप्रिल-मे महिन्यांमध्ये नद्यांसह बोअरवेल आणि विहिरींच्याही पाण्याची पातळी पाणी आटण्याइतपत खोल जात असल्याचे दिसून येत आहे. नद्यांचे पाणी अडवून धरतील असे धरणप्रकल्प नसल्याने पावसाचे पाणी नदीमार्गे थेट समुद्राला मिळत असल्याने उन्हाळ्यात तालुक्यातील नद्या कोरड्या, तर विहिरी तळाला गेल्याने जनतेच्या घशाला कोरड पडल्याचे दाहक चित्र गेली अनेक वर्षे कायम आहे.

यंदाच्या टंचाई आराखड्यामध्ये सार्वजनिक विहिरी खोल करणे किंवा गाळ काढण्यासाठी २१ गाव व ३२ वाडयांच्या प्रस्तावावर ७९.५० लाख खर्च अपेक्षित आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ४४ गाव ८१ वाडयांच्या प्रस्तावावर ३७.५० लाख खर्च अपेक्षित आहे. विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती ०६ गावातील १४ वाडयांसाठी सात लाख, तर विंधन विहिर कामासाठी १३ गावातील ३२ वाड्यांचा समावेश आहे. यासाठी ४६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे.

खासगी विहीर अधिग्रहण करणे एक गावातील अंदाजे एक लाख खर्च असे ८५ गाव १५९ वाडयांसाठी २४४ उपाययोजनांचा आराखडयामध्ये समावेश करण्यात आला आहे. याकामी १७१ लाख खर्च अंदाजित आहे. तालुक्यात पाणीटंचाई काळात टंचाईकृती आराखड्यामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी २२ गावे २२ वाडयांना एप्रिलपासून मागणी आल्यास टँकरने पाणीपुरवठा मंजुरीनंतर करण्यात येणार आहे.

यंदा मागील वर्षीपेक्षा पाणीटंचाईग्रस्त गावांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने आराखडयामध्ये ज्यादा गावांची नोंद करण्यात आली आहे. त्या गावांमध्ये उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होणे आवश्यक असून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने लोकप्रतिनिधींच्या सहभागासह उपाययोजनांची बिले वेळेवर काढल्यास टंचाई निवारण कृती आराखडयातील अंदाजित खर्च खर्ची पडण्यास मदत होणार आहे.

# पाली येथील जखमी कुत्र्याला अखेर जीवदान



**पाली : वृत्तसंस्था**

सुधागड तालुक्यातील पाली परिसरात गेल्या अडीच ते तीन महिन्यांपासून एक कुत्रा अत्यंत वेदनादायक अवस्थेत फिरताना दिसत होता. त्याच्या शरीरात केबल (क्लच वायर) अडकलेली असल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याची यातून सुटका करण्यात आली आहे.

या कुत्र्याच्या सुटकेसाठी हॅप्पी अम्ब्रेला फाउंडेशन आणि स्थानिक प्राणीप्रेमी नागरिकांनी वारंवार प्रयत्न केले, परंतु कुत्र्याच्या सतर्कतेमुळे प्रत्येक वेळी प्रयत्न अपयशी ठरत होते. अखेर या संवेदनशील प्रकरणाची दखल घेत पुणे बावधन येथील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट (वन्यजीव बचाव पथक) यांच्याकडे मदतीची विनंती करण्यात आली.

या आवाहनाला तातडीने प्रतिसाद देत पुण्यातून आलेल्या शंतनु लिमये आणि शुभम सिंग या प्रशिक्षित रेस्क्यू टीमने पाली परिसरात कुत्र्याचा शोध घेतला. अनेक तासांच्या संयमी आणि कौशल्यपूर्ण प्रयत्नांनंतर त्यांनी त्या कुत्र्याला कोणतीही अतिरिक्त इजा न होता सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले.

यानंतर पुढील उपचारासाठी या कुत्र्याला खुरावले येथील हॅप्पी अम्ब्रेला फाउंडेशन येथे हलविण्यात आले असून त्याच्यावर आवश्यक वैद्यकीय उपचार सुरू आहेत. उपचारानंतर हा कुत्रा पूर्णपणे बरा होऊन पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त सोडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या घटनेत प्राणीमात्रांविषयी असलेली माणुसकी आणि संवेदनशीलता अधोरेखित झाली. जीव वाचवण्यासाठी केलेल्या या प्रयत्नांमुळे नागरिकांतून रेस्क्यू टीम व स्वयंसेवकांचे कौतुक होत आहे.

### ट्रस्टचे आवाहन

**रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे ही वन्यजीवांवर उपचार करणारी एक महत्त्वाची संस्था असून बिबट्या, वाघ, कोल्हा, लांडगा, तरस, गवा तसेच लहान पक्ष्यांपासून मोठ्या प्राण्यांपर्यंत सर्व प्रकारच्या वन्यजीवांचे उपचार येथे केले जातात. कुठेही जंगली प्राणी जखमी किंवा अडचणीत आढळल्यास नागरिकांनी ९१७२५१११०० या हेल्पलाईन क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# प्रज्ञाशोध परीक्षेत शिपुरकर शाळेचे यश





**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत शिपुरकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धात्मक परीक्षेत शाळेतील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत गुणवत्ता सिद्ध केली.

विशेष उल्लेखनीय कामगिरी करत शिवण्या भूषण शिसोदे (इयत्ता पहिली) आणि वेदा मिलिंद पाठक (इयत्ता तिसरी) यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे सक्षम नेतृत्व आणि पालकांचा सातत्यपूर्ण पाठिंबा होता. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# पोलीस आणि 'माविम' मित्र मंडळाची संयुक्त बैठक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्यात आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंगीकृत ओम साई प्रेरणा लोकसंचालित साधन केंद्र अंतर्गत पोलीस आणि माविम मित्र मंडळाची संयुक्त बैठक उत्साहात पार पडली.

या बैठकीस रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक भैरू जाधव, हवालदार संजीवनी म्हात्रे, विधी सेवा प्राधिकरण स्वयंसेवक वैशाली वाघमारे, व्यवस्थापक शमीम चौधरी, सुनेत्रा भुर्के (सीएमआरसी कोषाध्यक्ष), शलाका राऊत (महिला दक्षता समिती व सीएमआरसी उपाध्यक्ष), कायदासाठी प्रशिक्षणार्थी प्राची जोमराज, सहयोगिनी



संगीता पाटील तसेच चौल, रेवदंडा, भोवाळे, बोर्ली, रामराज, महान, नांगरवाडी व बागमळा येथील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात शमीम चौधरी यांनी माविमची संकल्पना व महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव यांनी आपत्कालीन परिस्थितीत कोणत्या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच पोलिसांकडून मिळणाऱ्या मदतीबाबत मार्गदर्शन केले आणि नागरिकांना नेहमी सहकार्याचे आश्वासन दिले.

हवालदार संजीवनी म्हात्रे यांनी महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात मार्गदर्शन केले, तर विधी सेवा प्राधिकरणाच्या वैशाली वाघमारे यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली.

यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा माजी एसीपी (ठाणे वाहतूक शाखा) रमेश धाटावकर (रेवदंडा) व सेवानिवृत्त शिक्षक प्रकाश पाटील (सागमळा, चौल) यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कुर्डुगडावर शिवप्रेमींकडून स्वच्छता मोहीम

**माणगाव : बातमीदार**

जय शिवरायच्या घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात किल्ले कुर्डुगड येथे भव्य स्वच्छता मोहीम पार पडली. टीम कुर्डुगड, आंतरगाव निजामपूर क्रिकेट वेल्फेअर असोसिएशन आणि शिव प्रतिष्ठान उंबर्डी आणि इंजाई माता क्रिकेट संघ बोरमाच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात माणगाव-निजामपूर परिसरातील १००हून अधिक शिवप्रेमींनी सहभाग नोंदवला.



या मोहिमेत महादरवाजापासून हनुमंत बुरुजाकडे जाणारी अरुंद व धोकादायक पायवाट स्वच्छ करून माती, गवत आणि दगड हटवण्यात आले. परिणामी हा मार्ग अधिक रुंद व सुरक्षित करण्यात आला तसेच गडावरील वाड्याच्या अवशेषाजवळील परिसरही स्वच्छ करून शिवप्रेमींनीसाठी आणि पर्यटकांसाठी सोयीस्कर बनवण्यात आला.

याशिवाय गडाच्या मागील बाजूस असलेल्या सर्वात मोठ्या पाण्याच्या टाक्याच्या स्वच्छतेस सुरुवात करण्यात आली असून गड पुन्हा पूर्ववैभवात आणण्याचा निर्धार शिवप्रेमींनी व्यक्त केला.

कार्यक्रमादरम्यान धामणी गावातील पारंपरिक मर्दानी आखाडा खेळाचे थरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्यामुळे शिवकालीन परंपरेची उजळणी झाली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुणाईला गड-किल्ल्यांच्या जतन कार्यात सहभागी करून घेणे हे असल्याचे टीम कुर्डुगडने सांगितले.

या संपूर्ण मोहिमेचे नियोजन आंतरगाव निजामपूर क्रिकेट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष जयेश साळवी आणि टीम कुर्डुगड तसेच शिव प्रतिष्ठान उंबर्डी, इंजाई माता क्रिकेट संघ, बोरमाच यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मोहिमेत टीम कुर्डुगड, शिव प्रतिष्ठान उंबर्डी, बोरमाच क्रिकेट संघ तसेच धामणी, भागाड, टिटवे, बोरिवली, सणसवाडी, कडापेवाडी, कडापे आणि जोर या गावांतील तरुणांनी सहभाग घेतला. विशेष उपस्थिती म्हणून माजी भारतीय सैनिक प्रमोद शिंदे आणि तरुण सामाजिक नेतृत्व सुशील कदम यांनी उपस्थित राहून मावळ्यांना प्रेरित केले. श्रमदानानंतर उंबर्डी ग्रामस्थांनी दिलेल्या जेवणामुळे सहभागींची ऊर्जा द्विगुणित झाली. आर्थिक सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे टीम कुर्डुगडने आभार मानले.

# बेक केमिकल्समधील कंत्राटी कामगार कायम

**धाटाव : प्रतिनिधी**

जनरल मजदूर सभेच्या पाठपुराव्यामुळे बेक केमिकल्स कंपनीतील १८ कंत्राटी कामगारांना कायम कामगारांचा दर्जा देण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. जनरल मजदूर सभा व कंपनी व्यवस्थापन यांच्यात झालेल्या करारानुसार या कामगारांना टप्प्याटप्प्याने कायम सेवेत सामावून घेण्यात येत आहे.



यापूर्वी सहा कामगारांना कंपनीने स्वतःच्या रोलवर कायम कामगार म्हणून नियुक्त केले होते. नुकतेच आणखी सहा कामगारांना कायम कामगारांचा दर्जा देऊन त्यांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

जनरल मजदूर सभेचे सरचिटणीस संजय वढावकर, अध्यक्ष संज्योत वढावकर, उपाध्यक्ष शामकांत जोशी यांच्या हस्ते कामगारांना कायम सेवेचे पत्र देण्यात आले. यावेळी कंपनीतर्फे साईट हेड-डायरेक्टर समीर पवार, सिनिअर एचआर मॅनेजर गजानन बामणे, असिस्टंट मॅनेजर शैलेश निंबरे, युनियनचे सचिव जगदीश उपाध्ये, खजिनदार प्रशांत शेट्ये, रायगड संपर्कप्रमुख सुहास खरीवले, बेक कमेटी अध्यक्ष संजय शेळके, राजेश बानुगडे, विजय जाधव, सतीस चावरेकर, संदीप रटाटे यांच्यासह कामगार उपस्थित होते. या निर्णयामुळे कंत्राटी कामगारांमध्ये समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कुहीरेवाडी येथे घर-मंदिर प्रयोग




**रोहा : प्रतिनिधी**

पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय परिवाराच्या रचनात्मक कार्यातील विविध प्रयोगांपैकी आदिवासी वनवासी गावासाठी असणाऱ्या घर-मंदिर या एका अनोख्या प्रयोगाचा शुभारंभ रामनवमीच्या दिवशी नागोठणे येथील कुहीरे आदिवासी वाडीवर भावपूर्ण वातावरणात झाला.

रोहा तालुक्यातील नागोठणेजवळील कुहीरे या आदिवासी वाडीत गेली अनेक वर्षे स्वाध्याय परिवाराचे विधायक कार्य सुरू आहे. येथे स्वाध्याय केंद्र, महिला केंद्र, युवा-युवती केंद्र, बालसंस्कार केंद्र असे अनेक प्रयोग कार्यरत आहेत. या आदिवासीबहुल गावात घर-मंदिर हा प्रयोग व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. त्यानुसार गावात ६२ घरांपैकी ५२ कुटुंब स्वाध्याय कार्याशी भावपूर्णतेने जोडली गेल्यानंतर हा प्रयोग साकार झाला.

या प्रयोगाचा शुभारंभ रामनवमीपासून झाला. यानिमित्ताने गावात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे व्हिडीओ कॅसेटद्वारे प्रवचनसुद्धा दाखविण्यात आले. गावातील घर-मंदिराचा प्रत्येक पुजारी कुटुंबियांच्या घरी भगवान योगेश्वराची प्रतिमा पालखीतून नेण्यात आली.

# कोटेश्वरी मातेचा सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड येथील श्री कोटेश्वरी देवस्थान ट्रस्ट, विश्वस्त, पाखाडी अध्यक्ष व भाविकांच्या विचारविनिमयाने यंदा २३व्या वर्षीही ग्रामदैवत कोटेश्वरी मातेचा पालखी सोहळा मंगळवारी (दि.३१) आयोजित करण्यात आला आहे.

यानिमित्ताने सकाळी ७ वाजल्यापासून मंदिरात लघुरूद्र, दुग्धाभिषेक आणि त्यानंतर दुपारी ३ वाजता कोटेश्वरी मंदिरातून देवीची पालखी मिरवणूक निघणार आहे.

# वावंढळवाडी येथे विविध कार्यक्रमांनी रामनवमी साजरी

**चौक : प्रतिनिधी**

राम म्हणजे मर्यादा, त्याग आणि आचरणीय तत्व. मानवी जीवन हे मर्यादित असावे आणि तसे जगावे, समुद्र,पर्वत रांग आपल्या मर्यादा ओलांडत नाहीत, पण मानवाने मर्यादा ओलांडल्याने आपत्ती येत आहे, हे लक्षात ठेवावे, असे ज्येष्ठ कीर्तनकार हभप.प्रवीणमहाराज फराट यांनी वावंढळवाडी येथे श्रीराम नवमी कार्यक्रमात ते कीर्तनरुपी सेवेत उद्‌बोधित केले.

वावंढळवाडी येथील श्रीराम मंदिरात सालाबादप्रमाणे रामनवमी साजरी करण्यात आली. हभप कमलाकर काईनकर व सामाजिक कार्यकर्ते रामदास काईनकर यांनी आयोजित केलेल्या रामनवमी उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या परिसरात एकमेव राम मंदिर असल्याने भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

पहाटे काकडा आरती, अभिषेक, पूजा झाल्यावर हभप प्रवीणमहाराज फराट यांचे कीर्तन झाले. राम जन्मानंतर पाळणा सादर करण्यात आला आणि सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ, तरुण आणि महिला मंडळ यांनी सहकार्य केले.

# जंजिरा डिग्री कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्समध्ये प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडला.



या निरोप समारंभास महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादरी, प्राचार्य डॉ. साजिद शेख, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे अध्यक्ष कादरी यांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत उत्तम नागरिक बनून समाजसेवा करण्याचा संदेश दिला. प्राचार्य डॉ. शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले तसेच पदवी पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले आणि उच्च शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयेशा आरिफ, इफ्फा करबारी, बाजिला कादरी आणि मुस्कान मांडलेकर यांनी केले. नियोजन प्रा. बिस्माह किल्लेदार आणि तमसील शहजहान यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इतर सर्व अध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला.

# मुंबईचा विक्रमी विजय

## रोहित–रिकल्टनचे वानखेडे स्टेडियमवर वादळ

**मुंबई : प्रतिनिधी**

रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने वानखेडेच्या मैदानात विक्रमी विजयासह यंदाच्या हंगामाची दिमाखदार सुरुवात केली. कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ४ बाद २२० धावा करत २२१ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे मुंबईने शेवटच्या षटकात पार केले.



विशेष म्हणजे पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सने संघाने आतापर्यंतच्या इतिहासात कधीच एवढ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला नव्हता. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने सर्वाधिक धावांचा यशस्वी पाठलाग करताना सलग १३ वर्षे सलामीचा सामन्यात पराभूत होण्याची मालिकाही खंडीत केली.

२०१३च्या आयपीएल हंगामापासून मुंबई इंडियन्सचा संघाने आयपीएलमध्ये एकदाही सलामीची लढत जिंकली नव्हती. प्रत्येक हंगामात मुंबईच्या चाहत्यांवर पहिला सामना देवाला...असं म्हणायची वेळ आली, पण यंदाच्या हंगामात धमाकेदार विजयासह मुंबई इंडियन्सच्या संघाने 'तो' दुष्काळ संपवत १९व्या पर्वात जेतेपदाचा षटकार मारण्यासाठी सज्ज असल्याचा संदेशच दिला आहे.

कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने दिलेल्या विक्रमी २२१ धावांचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि रायन रिकल्टन जोडीने कोलकाताच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. पॉवर प्लेमध्ये या जोडीने ८० धावा कुटल्या. हाच धमाका पुढेही कायम ठेवत दोघांनी पहिल्या विकेटसाठी १४८ धावांची भागीदारी रचली. रोहितच्या रूपात मुंबई इंडियन्सने पहिली विकेट गमावली. त्याने ३८ चेंडूत सहा चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ७८ धावांची खेळी केली, तर रिकल्टनने ४३ चेंडूत चार चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ८१ धावांची खेळी साकारली.

सूर्यकुमार यादवने मुंबईच्या विक्रमी विजयात आठ चेंडूत १६ धावांचे, तर तिलक वर्माने १४ चेंडूत २० धावांचे योगदान दिले. नमन धीरने अखेरच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर चौकार मारत मुंबईचा पाच चेंडू आणि सहा विकेट्स राखून विजय निश्चित केला. हार्दिक पांड्याने ११ चेंडूत नाबाद १८ धावांची खेळी केली.

तत्पूर्वी अजिंक्य रहाणे–अंगक्रिश रघुवंशी यांची आक्रमक अर्धशतके आणि फिन ॲलन, रिंकू सिंग यांच्या फटकेबाजीच्या बळावर कोलकाता नाईट रायडर्सने निर्धारित २० षटकांत ४ बाद २२० धावांचा डोंगर रचला होता, मात्र ही धावसंख्यादेखील अपुरी पडली.

# महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत अमेघा घरतची 'रूपेरी' कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोलापूर येथे झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत उरण तालुक्यातील खोपटे गावची पैलवान अमेघा अरुण घरत हिने ५९ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल तिला रौप्यपदक देऊन गौरविण्यात आले.

रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे प्रेरणास्थान तथा लोकनेते मा.श्री. रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलाचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे क्रीडाप्रेमी आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष नगरसेवक परेश ठाकूर यांच्या प्रोत्साहन व पाठबळाने रायगडचे कुस्तीपटू स्वतःसह परिसराचे व जिल्ह्याचे नाव उंचावत आहेत. अमेघा घरतनेही राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकून यश मिळविले.



महाराष्ट्र राज्य कुस्ती संघाचे सचिव योगेश दोडके, भारत केसरी योगेश बोंबाळे, लोकनेते मा.श्री. रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुलाचे संस्थापक अध्यक्ष रूपेश पावशे यांनी अमेघाचे कौतुक केले. दरम्यान, तिचे सर्वत्र अभिनंदन होत असून अनेकांनी तिचे कौतुक केले आहे.

# मुरूड येथे रंगली आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम संस्थेच्या मुरूड शहरातील जंजिरा सायन्स ज्युनिअर कॉलेजचे सुवर्णमहोत्सवी, तर कला शाखेचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरा करताना येथे अंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांच्या हस्ते मशाल पेटवून या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

उद्घाटन यावेळी उपनगराध्यक्ष वीरेंद्र भगत, अंजुमन इस्लाम संस्थेचे सहसचिव अब्दुलरहिम कबले, खजिनदार अल्ताफ मलिक, अंजुमन आयटीआय चेअरमन समीर दाऊनाक, सदस्य तोसीफ फत्ते, नगरसेवक मनीष विरकुड, प्रिता चौलकर, प्रांजली मकू, प्रमिला माळी, मुख्याध्यापक वसीम सातारेकर, पर्यवेक्षक इष्टियाक आरिफ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी क्रिकेट स्पर्धा रंगली. यामध्ये अंजुमन इस्लाम हायस्कूलने प्रथम, अंजुमन श्रीवर्धन यांनी द्वितीय, तर तृतीय क्रमांक अंजुमन गौणघर यांनी प्राप्त केला. सूत्रसंचलन सहीदा कारभारी यांनी केले.

# 'खेलो इंडिया'त वेटलिफ्टिंगमध्ये साक्षी बुरकुलेला सुवर्णपदक

**रायपूर : प्रतिनिधी**



पहिल्या खेलो इंडिया ट्रायबल स्पर्धेत यवतमाळच्या साक्षी बुरकुलेने वेटलिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक जिंकून दिवस गाजविला. ८६ किलो गटात सर्वाधिक एकूण १५० किलो वजन पेलून साक्षीने पदार्पणातच सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला.

स्नॅच प्रकारातील तिसऱ्या प्रयत्नात साक्षीने ६८ किलो, तर क्लीन ॲन्ड जर्क प्रकारात ८२ किलो वजनाची कामगिरी करीत अव्वल स्थान पटकावले. यजमान छत्तीसगडच्या रूषिका कश्यपने १२१ किलोसह रौप्यपदक जिंकले. ११८ किलो वजनाची कामगिरी करणाऱ्या आसामच्या बितूपूर्णाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

# कोल्हापूरची अमृता पुजारी 'डबल महाराष्ट्र केसरी'

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर येथे झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत चित्तथरारक अंतिम लढतील कोल्हापूरच्या अमृता पुजारीने वेदिका सासनेला आस्मान दाखवत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि निर्जरा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर रविवारी रात्री महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेची अंतिम लढत अमृता पुजारी विरुद्ध वेदिका सासणे यांच्यात झाली. सुरुवातीपासून अमृताने आक्रमक चाल खेळत वेदिकाला कब्जात ठेवले होते.



पहिल्या दीड मिनिटात अमृताने दोन गुण मिळवत आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा तीन गुण मिळवून पहिल्या सत्रात ५–० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात वेदिकाने आक्रमक चाल खेळली, पण अमृताने संयम दाखवत पुन्हा दोन गुण घेतले आणि विजय पक्का केला. शेवटची दोन मिनिटे अमृताने बचाव करत वेदिकाला थोपवून ठेवले आणि ७–० या फरकाने विजय मिळवून डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विजेत्या अमृता पुजारी हिला चांदीची गदा, रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व किया सोनेट कारची चावी प्रदान करण्यात आली. उपविजेत्या वेदिका सासनेला २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि बुलेट बक्षीस देण्यात आली.

# 'केकेआर'विरुद्ध हिटमॅन रोहितचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२६ची धडाक्यात सुरूवात केली आहे. वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सविरूद्धच्या सामन्यात त्यांनी सहा विकेट्सनी विजय मिळवत हंगामाची विजयाने सुरुवात केली. या सामन्यात रोहित शर्माने ७८ धावांची दमदार खेळी करत आपण जबरदस्त फॉर्ममध्ये असल्याचे दाखवून दिले. विशेष म्हणजे केकेआविरूद्ध रोहितने एक मोठा विक्रमदेखील केला.




## सर्वाधिक धावांमध्ये वॉर्नरला टाकले मागे

मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरूद्ध सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला आहे. त्याने केकेआरविरूद्ध ११६१ धावा केल्या आहेत. यंदा आयपीएलच्या पहिल्याच सामन्यात रोहितने केकेआरविरूद्ध ३८ चेंडूत ७८ धावा केल्या. यात सहा चौकार आणि सहा षटकारांचा समावेश होता.


यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार डेव्हिड वॉर्नरने केकेआरविरूद्ध १०९३ धावा ठोकल्या होता. तो सनराईजर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्सकडून आयपीएल खेळला आहे, मात्र आता आयपीएल खेळत नाहीये.

केकेआरविरुद्ध धावा करण्याच्या बाबतीत डॉनगिरी करण्यात विराट कोहलीचा तिसरा क्रमांक लागतो. आरसीबीचा माजी कर्णधार विराटने केकेआरविरूद्ध १०२१ धावा केल्या आहेत.



ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

वर्ष २१ वे

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**
**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**



वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.

**अखंड हरिनाम सप्ताह**

ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा



व्यासपीठ चालक – ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी–देवाची)

प्रारंभ: चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता: चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

**दैनंदिन कार्यक्रम**

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

**मंगळवार, दि. ३१/०३/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. बळीराम महाराज (वाघीवली)
हरिपाठ - विठ्ठल रखमाई हरिपाठ मंडळ, खारकोपर
किर्तनकार - ज्ञानेश्वरी साधक ह.भ.प. नकुल महाराज भोईर (कोपरी-नवी मुंबई)
सौजन्य - श्री. सुधीर तुळशिदास ठाकूर (खारकोपर)

**बुधवार, दि. ०१/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव)
हरिपाठ - श्री गणेश हनुमान हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. श्रीकांत महाराज दुराफे (आळंदी - देवाची)
स्मरणार्थ - कै. सविता शिवाजी देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**गुरुवार, दि. ०२/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. मनीज महाराज (बेलपाडा)
हरिपाठ - भैरवनाथ हरिपाठ मंडळ, धुतूम
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोलाटकर (देवकान्हे-रोहा)
सौजन्य -सौ. श्रध्दा रमेश ठाकूर (खारकोपर)

**शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

**शनिवार, दि. ०४/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

**रविवार, दि. ०५/०४/२०२६**
प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

**सोमवार, दि. ०६/४/२०२६**
सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

**काल्याचे कीर्तन:** मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com